बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरूवार, दि.१५ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे ५२ वे सरन्यायाधीश

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:न्यायमूर्ती भूषण गवई यांनी देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून बुधवार दि. १४ मे रोजी शपथ घेतली. न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जीवनप्रवास महाराष्ट्रातील अमरावती पासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतचा एक प्रेरणादायी प्रवास आहे.

बालपण आणि कुटुंब भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती, महाराष्ट्र येथे झाला. त्यांचे वडील, आर. एस. गवई, हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) चे नेते होते आणि त्यांनी बिहार, सिक्कीम आणि केरळ या राज्यांचे राज्यपाल म्हणून देखील सेवा दिली.ते लोकसभेचे सदस्यही होते. गवई कुटुंब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित असून बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. त्यांचे बंधू, राजेंद्र गवई, हेही राजकारणात सक्रिय आहेत.



## कायदेशीर कारकीर्द

शिक्षण : भूषण गवई यांनी नागपूर विद्यापीठातून बी.ए. आणि एल.एल.बी. पदवी प्राप्त केली. वकील म्हणून प्रारंभ : १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीची नोंदणी केली आणि बारिस्टर राजा एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. स्वतंत्र वकिली : १९८७ ते १९९० या काळात मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली. नागपूर खंडपीठ : १९९० नंतर त्यांनी मुख्यत: नागपूर खंडपीठात संविधानिक आणि प्रशासकीय कायद्यांवर काम केले. शासकीय वकील : १९९२ ते १९९३ या काळात ते सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून कार्यरत होते. सरकारी अभियोक्ता : १७ जानेवारी २००० रोजी त्यांची नागपूर खंडपीठासाठी सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाली.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिला शपथविधी**

**१४ मे रोजी घेतली सरन्यायाधीश म्हणून शपथ**

**भूषण गवई ठरले पहिले बौद्ध सरन्यायाधीश**

## उच्च न्यायालय न्यायाधीश

१४ नोव्हेंबर २००३ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले आणि १२ नोव्हेंबर २००५ रोजी कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश : २४ मे २०१९ रोजी ते भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले.इतर भूमिका : ते महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूरचे कुलगुरू आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत.



## राजकारणात येण्याची शक्यता फेटाळली

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.आर. निवृत्तीनंतर राजकारणात येण्याची शक्यता गवई यांनी फेटाळून लावली आहे. ते म्हणाले की, सरन्यायाधीशपद भूषवल्यानंतर एखाद्या व्यक्तीने कोणतीही जबाबदारी घेऊ नये. केशवानंद भारती प्रकरणातील निकालाचा हवाला देत न्यायमूर्ती गवई यांनी त्यांच्या बौद्ध धर्माबद्दल, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी मालमत्ता जाहीर करण्याचे महत्त्व आणि संविधानाच्या सर्वोच्चतेबद्दलही भाष्य केले. ते म्हणाले बुद्ध पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर देशाच्या सरन्यायाधीशपदाची शपथ घेणे ही माझ्यासाठी खूप मोठी सौभाग्याची गोष्ट आहे. ते म्हणाले की– पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या वेळी सरन्यायाधीश संजीव खन्ना देशात नव्हते, म्हणून मी त्यांची परवानगी घेतली आणि संपूर्ण न्यायालयाला बोलावले. हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहण्यासाठी न्यायालयात दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

## सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली

**भूषण गवई हे भारताचे पहिले बौद्ध सरन्यायाधीश आहेत आणि अनुसूचित जातींमधून हे पद भूषवणारे दुसरे न्यायाधीश आहेत. त्यांनी सामाजिक आणि राजकीय न्यायासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून काम करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. त्यांचा जीवनप्रवास हा सामाजिक न्याय, समर्पण आणि कष्टाच्या मूल्यांचा आदर्श आहे. त्यांच्या नेतृत्वात भारतीय न्यायव्यवस्थेतील समावेशिता आणि विविधता अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे.**

## नोटाबंदीचे समर्थन केले होते

**न्यायमूर्ती गवई हे देशातील दुसरे दलित सरन्यायाधीश असतील. त्यांच्या आधी न्यायमूर्ती केजी बालकृष्णन हे भारताचे पहिले दलित सरन्यायाधीश झाले होते. २००७ मध्ये न्यायमूर्ती बालकृष्णन सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बनले होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून, न्यायमूर्ती गवई यांनी अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यामध्ये मोदी सरकारच्या २०१६ च्या नोटाबंदीच्या निर्णयाचे समर्थन करणे आणि निवडणूक रोखे योजना असंवैधानिक घोषित करणे समाविष्ट आहे.**

# बीडच्या आमदारांनी स्टंट करू नये

## अ‍ॅड.राजेंद्र राऊत:राजुरीच्या बोगसगिरीची चौकशी करणार का?

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: मतदारसंघात नरेगा अंतर्गत झालेल्या कामांची आमदार संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केल्यानंतर नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी आपणही आमदारांच्या कामांचे 'पोस्टमार्टम' करू शकतो, असा इशारा दिला आहे. नाळवंडीमध्ये अचानक पाहणी करून स्टंटबाजी केली जाते, पण नवगण राजुरीसारख्या गावांमध्ये झालेल्या मोठ्या गैरव्यवहारांचीही चौकशी आमदार करणार आहेत का? असा थेट सवाल करत ड.राऊत यांनी आमदारांनी स्टंटबाजी थांबवावी, असे म्हटले आहे.



नाळवंडी ग्रामपंचायतीने नरेगा अंतर्गत नियमांचे पालन करत कामे केली असून, संबंधित कामांची यापूर्वीच चौकशी झाली आहे, समितीचे अहवाल पाहूनच बिले अदा केली आहेत, आताही रस्ते लोकांच्या वापरात आहेत, कोणत्याही ग्रामस्थाची तक्रार नाही, असे ड.राऊत यांनी स्पष्ट केले. सदरील कामांवर पान २ वर

### रस्त्याचा प्रश्न कधी सोडविणार?

बीड तालुक्यातील बीड ते नाळवंडी हा रस्त्याचा प्रश्न ज्वलंत आहे. आमदारकीच्या संपूर्ण कार्यकाळात आमदारांनी या रस्त्याविषयी तोंडातून ब्र शब्द काढला नाही. परंतु लोकांच्या उपयोगात येत असलेल्या गावांतर्गत रस्त्यांची चौकशी लावण्याचा खटाटोप त्यांनी सुरू केला. आहे. चौकशीमध्ये वारंवार तोंडावर पडल्यानंतरही आमदारांकडून स्टंट थांबविला जात नाही, असे अ‍ॅड.राऊत यांनी म्हटले आहे.

### हिंमत असेल तर चौकशी करा!

नाळवंडीतील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेले काम दोन वर्षांपासून संथगतीने सुरू आहे. त्याचा गावातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून ग्रामस्थांना सध्याही पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या कामात आमदारांचे समर्थक सहभागी असल्याने चौकशी लावली जात नाही. हिंमत असेल तर या कामाची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, असा इशारा ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

# नरेगाच्या बोगस कामांचे 'पोस्टमार्टम'

## आ.संदीप क्षीरसागर: कारवाईसाठी पाठपुरावा करणार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:विधानसभा मतदारसंघात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच नरेगाच्या अंतर्गत अनेक निकृष्ट दर्जाची आणि बोगस कामे झाली आहेत. शासकीय अधिकारी यांच्याशी संगनमत करून अनेकांनी यामध्ये मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. या सर्व प्रकरणांचे आता आ.संदीप क्षीरसागर यांनी पोस्टमार्टम करायला सुरुवात केली आहे, म्हणजेच झालेल्या कामांची स्वतः आ.संदीप क्षीरसागर जाऊन पाहणी करत आहेत. नरेगा अंतर्गत झालेली कामे अत्यंत निकृष्ट आणि काही ठिकाणी तर चक्क बोगस असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. बीड विधानसभा मतदारसंघातील पान २ वर



# शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## डॉ. गोपाल बछिरे: लोणार तहसीलदार यांना निवेदन

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:कर्नल सोफिया कुरेशी यांचा अवमान करणारा मध्यप्रदेशचा कुकर्मी मंत्री कुवर विजय शहा यास मंत्री पदावरून बरखास्त करून त्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल होण्याकरिता निदर्शने करून निवेदन तहसीलदार मार्फत राष्ट्रपती यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने देण्यात आले



लोणार तहसील चा परिसर मंत्री शहा यांच्या विरोधात घोषणाबाजीने परिसर दणाणला मध्यप्रदेशचा सामाजिक न्याय मंत्री कुकर्मी, नीच, कुवर विजय शहा यांनी मध्य प्रदेशातील महू येथील जाहीर सभेत भारतीय स्थल सेनेची कर्नल व सिन्दुर या ऑपरेशन ची समन्वयक कर्नल सोफिया कुरेशी या वीर कर्नलला, पाकिस्तानच्या पान २ वर

# घरकुलच्या हप्त्यासाठी पैशाची मागणी

## बोंबला:इंजि.कांदेचा मनमानी कारभार

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:पंचायत समितीच्या घरकुल विभागाला असलेल्या इंजिनिअर कांदे मॅडम यांचा मनमानी कारभार दिसत आहे.



कांदे मॅडम कडून सर्व सामान्य लोकांकडुन घेण्यात येणारा पैसा कांदे मॅडम ला अंगलट येणार. चक्क घरकुल लाभार्थ्याकडून दुसऱ्या हप्त्यासाठी पाच हजाराची मागणी करत आहेत, जर लाभार्थ्यांनी तात्काळ पैसे नाही दिले तर इंजिनीयर कांदे लाभार्थ्याचे फोन घेण्यास टाळाटाळ करतात. घरकुल विभागात पान २ वर

# शिवसंग्रम सदस्य नोंदणीस प्रतिसाद

## बांधणी: ग्रामीण भागात सदस्य नोंदणी सुरु

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. १३ मे रोजी नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह येथे तर आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा येथे सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात पान २ वर



बोंबला | योजनेच्या नावाने घातला गंडा

# 'लाडकी बहीण'ची बनावट खाती

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरिकांची बँक खाती तयार करून त्यांचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर करणाऱ्या टोळीचा छडा पोलिसांनी लावला असून तब्बल अडीच हजारांहून अधिक बनावट खाती आढळली आहेत. याप्रकरणी जुहू पोलिसांनी आतापर्यंत ४ जणांना अटक केली आहे. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार प्रतीक पटेल गुजरातमधील असून तो सध्या फरार आहे.

लाडकी बहीण योजना महिलांसाठी असली तरी आरोपींनी तयार केलेली बहुतांश बँक खाती पुरुषांची होती. आरोपी प्रतीक पटेलने त्याची काही माणसं या कामासाठी नेमली आणि बनावट बँक खाती उघडली. अविनाश कांबळे हा या प्रकरणातील एक आरोपी असून त्याला जुहू पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्या पान २ वर



### प्रत्येक खात्यामागे ४ हजारांची कमाई

२५ वर्षांचा आरोपी अविनाश कांबळे हा नेहरूनगर, देवनार, डीएन नगर, धारावी इथल्या परिसरातील झोपडपट्टी परिसरात फिरून 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली लोकांकडून कागदपत्रे घेऊन बँक खाती उघडायचा आणि त्यांना तात्काळ एक हजार रुपये द्यायचा. त्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे येतील असं आश्वासनही तो त्यांना द्यायचा. तात्काळ हजार रुपये मिळत असल्याने लोकांचाही त्याच्यावर विश्वास बसायचा.

### मुख्य सुत्रधार गुजरातला पळाला

अविनाश ही बँक खाती टोळीतील फाल्गुनी जोशी, रितेश जोशी आणि श्रुती राऊत यांना विकायचा. प्रत्येक खात्यामागे त्याला चार हजार रुपये मिळत होते. हे त्रिकुट बँकांचे तपशील गुजरातमधील प्रतीक पटेल याला द्यायचे. याबाबत फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या टोळीची पाळेमुळे खणण्यास सुरुवात केली. जुहू पोलिसांनी अविनाश कांबळे याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने अनेक बँक खाती उघडल्याचं निष्पन्न झाले. बँक खाती उघडताना बँकेने संबंधित ग्राहकाच्या पत्त्याची शहानिशा करणं आवश्यक असते. मात्र बँक ते करत नाही. याचाच फायदा घेत आरोपींनी नागरिकांची कागदपत्रे घेऊन त्यांच्या नावाने शेकडो बँक खाती उघडली असे जुहू पोलिसांनी सांगितले.

# सरस्वती शाळेची गगण भरारी

## अभिनंदनिय:माध्यमिक परीक्षेत यशाची परंपरा कायम



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: शहरातील धानोरा रोड येथील सरस्वती विद्यालयाने दहावीच्या निकालात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही यशाची परंपरा कायम ठेवली.

क्षितीज नंदकुमार उघाडे या विद्यार्थ्याने ९१.६० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला . संदीप संजय पवार या विद्यार्थ्याने ९०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला, तर ८९ टक्के गुण मिळवून समीक्षा कुल्थे या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळवला . सत्काराला उत्तर देताना क्षितीज उघाडे हा विद्यार्थी म्हणाला की , महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या कॉपीमुक्त अभियानाचे तंतोतंत पालन करण्याचे आम्हाला आमच्या सर्व शिक्षकांनी आवाहन केले आणि विषयानुसार अभ्यास कसा करावा याचे वेळापत्रक करून दिले त्यानुसार मी अभ्यास केला.शालेय अभ्यासक्रमाबरोबर स्पर्धा परीक्षांची तयारीही शाळेत करून घेतली जाते. पान २ वर

## भारताचा करारी बाणा

पाकिस्तानशी संघर्षविरामाला मान्यता दिल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्याच भाषणातून भारताचा करारी बाणा आणि योग्य वेळी संयम राखण्याची भूमिका नेमकेपणाने जगापुढे आली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सुरू केलेले 'ऑपरेशन सिंदूर', पाकिस्तानशी लष्करी संघर्ष आणि अमेरिकेच्या पुढाकाराने त्याला स्थगिती या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत होत्या; तसेच विशेषत: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांवरून शंकाही उपस्थित करण्यात येत होत्या.मोदी यांच्या भाषणातून यांपैकी बहुतांश प्रश्नांना उत्तरे मिळाली आहेत. पाकिस्तानच्या पोकळ धमक्यांना भारताने लक्ष्याधारित हल्ल्यांद्वारे उत्तर दिलेच होते; पण योग्य वेळी सामोपचाराची भूमिकाही घेतली. त्यामुळेच संघर्षाची चाहूल लागल्यापासून 'अण्वस्त्रधारी देश' म्हणून पाककडून आळविण्यात येत असलेल्या पालुपदाच्या पार्श्वभूमीवर मोदी यांच्या 'अण्वस्त्रांना घाबरत नाही,' या भूमिकेला कृतीचे बळ प्राप्त झाले. अमेरिकेच्या पुढाकाराबाबत काही बाबी देशवासीय आणि जगापुढेही स्पष्ट करणे आवश्यक होते. सोबतच अमेरिकेचा पुढाकार हा सध्याचा संघर्ष निवळण्यापुरताच असल्याचे सांगून पाकिस्तानशी चर्चेच्या शक्यतेबाबतही भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार गरजेचा होता. त्या पार्श्वभूमीवर काश्मीरप्रश्नी फक्त 'पाकव्याप्त काश्मीर' याच मुद्द्यावर चर्चा होऊ शकते, हेसुद्धा ठळकपणे जगापुढे आले. दहशतवादाच्या दुखण्यावर भारताने सिंधू करार स्थगितीपासून ते 'ऑपरेशन सिंदूर'पर्यंत पावले उचलली आहेत. ही कारवाई करण्याची गरज का भासली, यावरही मोदी यांनी प्रकाश टाकला आणि यापुढील काळात दहशतवादी हल्ले हे युद्धच मानले जाईल, त्यामुळे दहशतवाद्यांचे भरणपोषण थांबवा, असा कडक इशाराही दिला. आता पाकिस्तान या घटनाक्रमातून काही धडा घेणार का, हे येत्या काळात स्पष्ट होईल.गेली काही दशके पाकपुरस्कृत दहशतवाद वारंवार डोके वर काढत आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या काही काळात भारताने पाकिस्तानला जागतिक पातळीवर एकटे पाडण्यासाठी कूटनीती अवलंबिली; मात्र खुद्द पाकिस्तानला एक प्रकारे अनुल्लेखाने मारण्याचे एक अलिखित धोरणही दिसून येत होते. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानची आदळआपट सुरू झाली. भारताने एकीकडे घटनेतील कलम ३७० रद्द केल्याने काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या पाकच्या प्रयत्नांना आळा बसला होता. तसेच तेथे प्रचंड मतदानाद्वारे झालेल्या निवडणुकीतून लोकनियुक्त सरकारची स्थापना आणि पर्यटनाद्वारे आर्थिक विकासाला चालना, अशी पावले उचलण्यात येत होती. परिस्थिती सुरळीत होत असल्याचे हे चित्र धूसर करण्याचा प्रयत्न पहलगाम हल्ल्यातून झाला होता. त्याला लष्करी आणि कूटनीतीच्या मार्गाने दिलेल्या कडक उत्तराने भारत या संघर्षात चार पावले पुढे राहिला आणि दहशतवादाला दयामाया नाही, हा संदेश दिलाच; सोबतच युद्ध हा कायमस्वरूपी उपाय नाही, हे लक्षात घेऊन शस्त्रसंधीला प्रतिसाद दिल्याने, भारत पाकिस्तानप्रमाणे युद्धखोर नसल्याचे पुन्हा अधोरेखित झाले. यामुळे भारताची प्रतिमा उजळून निघाली, हे यावर टीका करणाऱ्या शंकासुरांनी समजून घेतले पाहिजे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांना व्यापार थांबविण्याचा इशारा दिल्याचे म्हटले असले, तरी उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी व्यापाराचा मुद्दा उपस्थित झाला नसल्याचे म्हटले आहे. तसेच संभाव्य व्यापारयुद्धात अमेरिकेने चीनशी जुळवून घेतल्याने भविष्यात भारतालाही व्यापारसंधीच्या धोरणांवर विचार करून पावले टाकणे आवश्यक आहे. आजवर साथ दिलेल्या विरोधकांच्या मागणीप्रमाणे सरकार संसदेचे अधिवेशन घेणार काय, याबाबतही उत्सुकता आहे. काश्मीर आणि देशभरात सुरक्षाव्यवस्था बळकट करणे, हे तातडीचे उद्दिष्ट असून काही दिवसांत सुरू होणारी अमरनाथ यात्रा सुरळीत पार पाडणे, हे आव्हान आहे. देशांतर्गत भारतविरोधी दबावामुळे उसने अवसान आणल्याचे दिसले, तरी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानला हा संघर्ष वाढू देणे परवडणारे नव्हतेच. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीत पाकिस्तानला जाहीर झालेली मदत आणि शस्त्रसंधीसाठी अमेरिकेने घेतलेला पुढाकार यांचे धागेदोरे जुळतात काय, ही उत्सुकतेची बाब आहे.

# दूध डेअरी मालक शेतकऱ्यांपेक्षा सुखी!

## बोंबला: घ्यायचे ५५ ने आणि विकायचे ७० ने

फिरदोस खान पठाण लोणार

लोणार:तेच दूध, तीच क्वालिटी पण भाव मात्र दोन. लोणार शहरातील दूध डेअरी मालक शेतकऱ्यांच्या दुधाला ५५ ते ६० रुपये भाव देतात आणि हेच दूध डेअरी मालक ग्राहकांना ७० रुपये लिटर विक्री करत असल्याने शेतकऱ्यांच्या दुधाची मलई डेअरी मालक खात असल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे ग्राहकांना ७० रुपये देऊनसुद्धा निखं दूध मिळत नसल्याने त्यांचीही फसवणूक होत आहे.

दुग्ध व्यवसाय वाढावा, शेतकऱ्यांचा कणा ताठ रहावा यासाठी शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाची निवड करतात. मागील पाच वर्षांपूर्वी शेतकरी जर्सी गायींची जोपासना करायचे. कारण देशी

गायीपेक्षा जर्सी गायी दूध जास्त देत असत. पण, सध्या देशी गायीच्या दुधाचे महत्त्व सर्वांना पटू लागले असल्याने देशी गायीच्या दुधाला मागणीही वाढली आहे. यामुळे लोणार तालुक्यातील काही शेतकरी देशी, गिर गायी व म्हैस संगोपनाकडे वळले आहेत. गावरान, पंढरपुरी, मुरा, जाफर या जातींच्या म्हशी ठेवून हा दुग्ध व्यवसाय असंख्य तरुण शेतकरी करत आहेत. दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे दूध डेअरी मालक खरेदी करतात. यासाठी लेक्टोमीटर, फॅट, एनएसएफ, पाण्याचे प्रमाण तपासून दुधाला भाव देतात. म्हशीच्या दुधाला ५५ ते ६० रुपये भाव शेतकऱ्यांना दिला जातो. आणि हेच दूध ज्याचा फॅट कमी आहे, पाण्याचे प्रमाण अधिक आहे असे दूध ग्राहकांना ७० रुपये लिटर विकल्या जाते.



### शेतकऱ्यांनी विश्वासार्हता गमावल

दुग्ध व्यवसायाबाबत शेतकऱ्यांनी विश्वासार्हता गमावली आहे. ग्राहकांनी दुधाला कितीही भाव दिला तरी दुधात त्याचे पाणी टाकणे काही सुटत नाही. यामुळे नागरिक शेतकऱ्यांकडून कमी दूध खरेदी करत आहेत आणि जास्त खरेदी दूध डेअरीवरून करत आहेत. याचाच फायदा दूध डेअरी मालक घेत असून ५५ रुपयांनी खरेदी केलेले दूध ग्राहकांना ७० रुपये भावाने विकल्या जात आहे.

### ग्राहक व शेतकऱ्यांत समन्वय हवा

माझ्याकडे लोणार येथे डझनभर म्हशी आहेत मी थेट ग्राहकांपर्यंत संपर्क साधतो आणि प्रति लिटर ७० रुपये भावाने दूध विक्री करत आहे. ग्राहक व शेतकरी यांच्यात समन्वय राहिल्यास आणि शेतकऱ्यांनी निखं दूध दिल्यास दुधाला चांगला भाव मिळतो.

–मोहफिज़ भाई

## पान सहा वरून

**भक्त नको अनुयायी**

हे आवर्जून उपस्थित होते. धम्मदेसनेच्या कार्यक्रमात पुज्य भिक्खु रेवतबोधी यांनी तथागत गौतम बुध्दांचे आणि धम्माचे भक्त नको अनुयायी बना असे मार्गदर्शन करत असताना बौध्द उपासक आणि बौध्द उपासिका यांना बुध्द धम्माच्या मार्गावर चालत असताना बुद्धांचे भक्त न होता बुध्दांचे अनुयायी बना असे सांगितले .तसेच परळी शहर भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलाच्या वतीने आयोजित बुद्ध जयंतीचे आणि कार्यक्रमाचे कौतूक पुज्य भिक्खु रेवतबोधी यांनी केले. यावेळी कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा शहर ,तालुका ,ग्रामीण व वार्ड शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व समता सैनिक दलाच्या सैनिकांनी अथक परिश्रम घेतले. या जयंती उत्सवानिमित्त परळी शहर आणि ग्रामीण भागातील बौध्द बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी शहर व तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोलाचे सहकार्य केले. त्यानंतर पहलगाम येथील शहीदांना आदरांजली अर्पण करून कार्यक्रमाच्या शेवटी सारणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**संभाजी राजेंचे विचार आत्मसात**

हे शौर्य, विद्वत्ता आणि स्वाभिमानाचे सर्वोच्च प्रतीक होते. आपणही त्यांच्यासारखं निडर, कर्तव्यनिष्ठ, आणि नीतिमान व्हावं व त्यानुसार वागावं असा उद्देश त्यांनी स्पष्ट मांडला. धैर्याने जगायला शिका, अन्यायाला झुकवायला शिका – हाच खरा संभाजीराजांचा मार्ग असल्याचे श्रीमती कांबळे यांनी सांगितले. एपीओ माळवदकर यांनी देखील छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

**समाज कल्याणचा निधी**

मार्गदर्शनाखाली निवेदन देताना युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, जिल्हा सचिव ड. दत्ता जाधव, माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, जिल्हा संघटक राधाकिसन भाळशंकर, माजलगाव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, उद्योजक सेल तालुकाध्यक्ष मोहन त्रिमुखे, उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, सल्लागार बंडु सोनवणे, भगवान सोनवणे साहेब, पी. के. ग्रुप पद्माकर कांबळे, ज्ञानेश्वर ठोंबरे सर, सचिन वाघमारे सर, अरविंद खंडागळे, शाहादेव, संतोष खंडागळे, वसंत वाघमारे, दीपक घोगरे, विलास गवळी, सौरभ ससाने निवेदन देण्यात आले.

**पद्मश्री शंकरबापू विद्यालयाचे**

अध्यक्ष मा विश्वंभर अप्पा पाटील, मार्गदर्शक विलास पापा पाटील. संस्थेचे सचिव मा किरण पाटील, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर यांनी अभिनंदन केले.

**कटकारस्थानाने आळंदी**

आहे. अधिक चौकशी असे लक्षात आले की, सदरील आदेश हा सुमारे १३ महिन्यांपूर्वीचा म्हणजे १५ मार्च २०२४ चा असून, सुमारे १२ कोटी रुपयांचे हे काम एक वर्षाच्या विलंबाने का सुरू झाले आहे, हे कळू शकले नाही. या प्रकरणांमुळे खालील प्रश्न निर्माण होतात. १. कार्याची एकूण व्याप्ती बघता त्यासाठी १२ कोटी रुपयांचा खर्च खरंच आवश्यक आहे का?२. हे घाट सुमारे १५-२० वर्षाच्या कालावधीमध्ये पुण्यातील श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती आणि विश्वशांती केंद्र (आळंदी) या दोन संस्थांच्या संयुक्त पुढाकाराने आणि महाराष्ट्रातील समस्त वारकरी भाविकभक्तांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष योगदानाच्या माध्यमातून बांधले गेले आहेत. सदरील घाटांचे सर्व संमतीप्राप्त नकाशे वरील संस्थांकडे उपलब्ध असताना देखील अशा प्रकारचे कार्य अचानकपणे आणि त्यांना विश्वासात न घेता का सुरू करण्यात आले?३. घाट बांधतानाच त्यांच्याखाली सुमारे ६ फूट उंच व ४ फूट रुंदीची काँकीटची गटारं बांधण्यात आली होती, जी आळंदी शहराचे सांडपाणी वाहून नेण्यास समर्थ होती, असे असतानादेखील नवीन सांडपाण्याची व्यवस्था करण्याची काय गरज होती? ४. हे कार्य शक्यतोवर रात्रीच्या वेळेतच करण्यात आले, त्यामागचे कारण काय? ५. सदरील घाटावर वारकरी संप्रदायातील अनेक अध्वर्यू संतमंडळींच्या समाध्या आहेत. या समाध्यांना बांधकामा दरम्यान हानी पोहचली असून, या समाध्यांची शासनातर्फे कशा प्रकारे दुरुस्ती करण्यात येणार आहे? या सर्व प्रकारामुळे वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेला व भावनेला तडा गेलेला आहे. तसेच माऊलींच्या आणि जगद्गुरूंच्या पवित्र कार्याला काळीमा फासला गेला आहे, अशी भावना समाजामध्ये निर्माण झाली आहे. या व अशा अनेक महत्त्वपूर्ण प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी आणि या किळसवाण्या प्रकाराची चौकशी करून यावर समाधानकारक तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत वारकरी, कीर्तनकार, प्रवचनकार जसे ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे, ह.भ.प. श्री. धर्मराज महाराज हांडे, ह.भ.प. श्री. बाळासाहेब बडवे, ह.भ.प. श्री. यशोधन महाराज साखरे, ह.भ.प. श्री. चंद्रकांत महाराज वांजळे, ह.भ.प. श्री. शालीकराम खंदारे, ह.भ.प. श्री. महेश महाराज नलावडे, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रवीकुमार चिटणीस, प्रकुलगुरु डॉ. मिलींद पांडे, कुलसचिव श्री. गणेश पोकळे, डॉ. महेश थोरवे इ. मा. मुख्यमंत्र्यांकडे भेटण्याची वेळ मागून, त्यांना प्रत्यक्ष भेटून सविस्तर निवेदन देणार आहेत. या परिषदेला डॉ. स्वाती कराड-चाटे, हभप यशोधन साखरे महाराज, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एम. पठाण, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे उपस्थित होते.

**भूमी अभिलेख कार्यालयात**

कामासाठी शेतकऱ्यांना वारोवार चकरा माराव्या लागतात, खाजगी दलाला मार्फत काम तात्काळ होत, वरील विषयाची चौकशी करून सतत गैरहजर राहणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा केज उपविभागीय भूमि अभिलेख कार्यालयाला शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने दि २० मे रोजी कुलुप ठोकण्यात येईल आसे जिल्हा अधिकारी कार्यालय बीड, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय बीड, दिलेल्या निवेदनात भाई मोहन गुंड, ड निखिल बचुटे, पप्पु भोसले, आप्पा गवळी, दशरथ आकुसकर, नसरीन बागवान यांनी दिला आहे.

# संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा

## अभिवादन: चिंचोली माळीच्या जनतेचे स्वप्न साकार



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील चिंचोली माळी येथे १४ मे २०२५ रोजी भुतो ना भविष्य असा पुर्ण आकृती शिवश्री छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची स्थापना करण्यात आली छत्रपती संभाजी महाराज म्हणजे छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले (१४ मे १६५७ – ११ मार्च १६८९) हे छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी सईबाई यांचे थोरले चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे.

अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी होते छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महारांजी केला. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता. संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज होते.

## पान एक वरून

**बीडच्या आमदारांनी स्टंट**

आमदारांनी जाऊन केवळ फोटोसेशन केले. ते सध्या काही निवडक गावांमध्येच लक्ष केंद्रित करत असून, त्यांनी शिफारस केलेल्या कामांची चौकशी होईल का? त्यांच्या स्वतःच्या गावामध्ये झालेल्या बोगसगिरीची चौकशी लावतील का? असे सवाल ड.राऊत यांनी उपस्थित केले आहेत. जर आमदारांना खरंच भ्रष्टाचारविरोधी लढा द्यायचा असेल, तर मग नवगण राजुरीसारख्या स्वतःच्या आणि निकटवर्तीय पदाधिकाऱ्यांच्या गावांमध्ये झालेल्या बोगस कामांचीही पाहणी करून वस्तुस्थिती मांडावी. निवडणुकीच्या तोंडावर निवडक गावांमध्ये जाऊन स्टंट करून जनतेची दिशाभूल करणे थांबवावे. शासनाच्या निधीचा अपव्यय कोठे झाला असेल, तर संबंधितांवर कारवाई व्हावी, याला आमचाही पाठिंबा आहे. पण कारवाई ही निवडक नसून सर्वसमावेशक असली पाहिजे, अशी भूमिका सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी मांडली. न्याय हवा असेल, तर तो सर्व गावांना सारखाच मिळाला पाहिजे, असा ठाम इशारा ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

**नरेगाच्या बोगस कामांचे**

बीड आणि शिरूर कासार तालुक्यात अनेक ठिकाणी बोगस कामे झाल्याचा तक्रारी होत्या. अनेक कामे हि अतिशय निकृष्ट झालेली आहेत. काही विशिष्ट लोक, ठेकेदार आणि शासकीय अधिकारी यांनी संगनमत करून भ्रष्टाचारी पॅटर्न राबवला आहे. या गंभीर विषयाची दखल घेत आ.संदीप क्षीरसागर यांनी झालेल्या बोगस आणि निकृष्ट कामांची पाहणी आणि चौकशी सुरु केली आहे. बुधवारी (दि.१४) रोजी बीड तालुक्यातील नाळवंडी आणि काळेगाव हवेली या गावांमध्ये आ.संदीप क्षीरसागर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत जाऊन झालेल्या निकृष्ट आणि बोगस कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. आता बीड मतदार संघात झालेल्या नरेगाच्या प्रत्येक बोगस आणि निकृष्ट कामाची मी स्वतः जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. शासनाच्या निधीची पद्धतशीर विल्हेवाट लावण्याचे काम करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

**शहावर देशद्रोहाचा गुन्हा**

आतंकवाद्यांची बहीण व आतंकवाद्यांच्या बहीनिच्याच हाताने पाकिस्तानच्या आतंकवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पाठवले व तिने पाकिस्तानची आयसीच्या तैसी केली अशा प्रकारचे अभद्र, अमानवीय, व बर्बारातापूर्ण वक्तव्य केले त्यामुळे भारतमातेची लेक थळ सेनेची कर्नल सोफिया कुरेशी केवळ ती मुस्लिम समाजाची असल्यामुळे यांच्यावर बरबरर्तापूर्ण विधान करून त्यांचा व भारतीय सैन्याचा अपमान केला.कर्नल सोफिया कुरेशी यांच्या तीन पिढ्या भारतीय सैन्य दलात होत्या आणि त्यांनी भारतीय सैन्य दलात अनेक पराक्रम केले अशा भारतीय सैन्यदलातील कर्नल सोफिया कुरेशींना पाकिस्तानच्या मुस्लिम आतंकवाद्यांची बहीण म्हणून हिणवण्यात आले त्यामुळे भारतीय लेकीचा, आमच्या बहिणीचा व भारतीय सैन्याचा अपमान अवमान करण्यात आला आहे हे देशद्रोह आहे. त्यामुळे मध्यप्रदेशचा नीच नालायक कुकर्मी सामाजिक न्याय मंत्री कुवर विजय शहा यांना तत्काळ मंत्रीपदावरून बरखास्त करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्यास कठोर शासन करण्यात यावे यासाठी लोणार तहसीलवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निदर्शने करून तहसीलदाराच्या द्वारे राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले याप्रसंगी शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे तालुकाप्रमुख एड. दीपक मापारी शहर प्रमुख गजानन जाधव सर, सुदन अंभोरे सर, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, युवासेना तालुका उपप्रमुख अमोल सुटे, युवासेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, तालुका संघटक कैलास अंभोरे, फहीम खान, अश्फाक खान, ज्ञानेश्वर दूधमोगरे, नंदकिशोर पिसे, शेख अशक शेख इब्राहिम, गजानन अवसरमोल, विनायक मापारी, गोपाल मापारी, आदी मान्यवर सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**घरकुलच्या हप्त्यासाठी पैशाची**

इंजिनियर कांदे यांचा घरकुल विभागात इंजिनियर कांदे यांचा मनमानी कारभार पाहून लाभार्थी हैराण झाले आहे. लाभार्थ्यांनी प्रसिद्धी माध्यमाच्या माध्यमातून विशेष मागणी केली आहे ती तात्काळ इंजिनीयर कांद्याचे हकलपट्टी करा तसेच आम्हाला दुसरा इंजिनिअर द्या, आमचे घर होत असतानाही आम्ही का पैसे द्यावे ? असे लाभार्थी म्हणत आम्हाला दुसरा इंजिनिअर द्या, आमचे घर होत असतानाही आम्ही का पैसे द्यावे ? असे लाभार्थी म्हणत आहेत. इंजिनीयर कांदे यांचा मनमानी कारभार किती दिवस चालणार, किती दिवस लाभार्थी सहन करणार अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

**शिवसंग्रम सदस्य नोंदणीस**

आली. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेली शिवसंग्राम तळागळा पर्यंत पोहचवण्यासाठी शिवसंग्राम सदस्य नोंदणी कार्यक्रम आपण हाती घेत आहोत अशी घोषणा शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. या सदस्य नोंदणीची सुरवात दि. २ मे रोजी जिल्ह्यात करण्यात आली. आता दुसऱ्या टप्प्यात तालुक्यात आणि सर्कल निहाय सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. यात नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह , चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा , बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागात आणि भाळवनी या ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान पार पडले यावेळी या सदस्य नोंदणीस जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून लोकनेते यांचा विचार जिवंत ठेवण्यासाठी आपण शिवसंग्रामचे सदस्य होता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील,उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने,युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे,गणेश धोंडरे सचिन जाधव, चौसाळा सर्कल प्रमुख विशाल हावळे, गौतम जोगदंड, राजु येडे, शिवसंग्रामचे तालुकाउपाध्यक्ष दिनकर शेळके,तालुका सचिव सिताराम घुमरे,नाळवंडी सर्कल प्रमुख नागुराव बोरगे, डेकनमोह गण प्रमुख विलास चव्हाण,पाली गण प्रमुख चंद्रकांत देवकर,विजय सुपेकर, बळीभाऊ थापडे,उल्हास घोरड,वैभव डावकर आदीसह कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सरस्वती शाळेची गगण**

त्यामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थी एन एम एम एस व स्कॉलरशिप परीक्षेत मोठ्या प्रमाणात यशस्वी होतात. माझ्या यशात आई-वडिलांचाही महत्त्वाचा वाटा आहे. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मयुरी गुरव ही विद्यार्थिनी म्हणाली की , मी पाचवीपासून या शाळेत शिक्षण घेत आहे या शाळेत पुस्तकी ज्ञानाबरोबर सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणही मोठ्या प्रमाणात केली जाते. दहावी परीक्षेत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला .याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी संचालक प्रशांत पवार , डॉ. नंदकुमार उघाडे , मुख्याध्यापक अंकुश गोरे यांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक ज्ञानेश्वर ढोरमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीराम घोडके यांनी केले.

**'लाडकी बहीण'ची बनावट**

चौकशीतून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. 'लाडकी बहीण' योजनेसाठी बँकेत खाते उघडावें लागते. याच गोष्टीची संधी साधत प्रतीक पटेलने त्याची माणसं नेमली. या प्रकरणात अविनाशसह फाल्गुनी जोशी, रितेश जोशी आणि श्रुती राऊत यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी टोळीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

**१९.४३ लाख रुपयांची रोकड जप्त :** आरोपी श्रुती राऊतच्या घराची झडती घेतल्यानंतर अनेक बँकांचे पासबुक, बँकांशी संलग्न सिमकार्ड्स पोलिसांना मिळाले. आम्ही १०० हून अधिक खाती संबंधित बँकेला संपर्क साधून बंद केली आहेत. त्याचप्रमाणे १९.४३ लाख रुपयांची रोकड जप्त केली'', अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या टोळीचा छडा जरी पोलिसांनी लावला असला तरी या प्रकरणातून योजनेच्या पडताळणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## हॅप्पी बर्थ डे



**विजय दर्डा** (लोकमत समूह)



**नताशा रस्तोगी** (अभिनेत्री)

**अरविंद सिंग** (आयएएस)

**जरीन खान** (अभिनेत्री)

**हॅरिस शेख** (पत्रकार)

**जयाबेन ठक्कर** (माजी खासदार)

**संतोष खिरीड** (भाजपा)

**सुबोध महाजन** (सौर ऊर्जा तज्ज्ञ)



सीएमएपी (सीमॅप) लखनउचे संचालक डॉ. प्रबोध कुमार त्रिवेदी यांचे प्रमुख पाहुणे सीएसआरआर लखनउचे संचालक डॉ. भास्कर नारायण यांचा सत्कार करताना.

# मेट्रो-९ मार्गिकेवर आजपासून ट्रायल रन सुरू

## मुख्यमंत्र्यांच्याहस्ते चाचणीचा शुभारंभ

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या बुधवारी मेट्रो मार्ग-९ टप्पा-१ काशिगाव ते दहिसर-पूर्व चे ट्रायल रन व तांत्रिक पहाणी करण्याचे नियोजित आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष यांच्या हस्ते भायंदर-पाडा उड्डाणपुलाचे लोकार्पण आयोजित करण्यात आले आहे.



मेट्रो लाईन-९ मार्गिकेवर उद्या बुधवारपासून चाचणी सुरू करण्यात येणार आहे, ही शहरातील पहिली मेट्रो चाचणी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अधिकृतपणे सकाळी ११ वाजता चाचणीचा शुभारंभ करतील. मेट्रो-९ ही रेड लाईनचा एक भाग आहे. ती दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व पर्यंत जाणाऱ्या लाईन ७ पासून सुरू होते. फेज १ मध्ये, मेट्रो अंधेरी (वेस्टर्न एक्सप्रेस हायवे) ते काशीमिरा पर्यंत जोडेल. फेज २ मध्ये, ही लाईन भाईंदर (पश्चिम) मधील सुभाषचंद्र बोस स्टेडियम पर्यंत वाढेल. हा मार्ग दहिसर ते मीरा-भाईंदर पर्यंत देखील जातो. मेट्रो लाईन ९ एकूण १३.५८१ किमी लांबीचा आहे. त्यात एलिव्हेटेड (११.३८६ किमी) आणि भूमिगत (२.१९५ किमी) ट्रॅक दोन्ही समाविष्ट आहेत. यात १० स्थानके असतील.

पहिल्या टप्प्यात चार स्टेशन उघडतील. ही दहिसर, पांडुरंग वाडी, मीरागाव आणि काशीगाव आहेत. उर्वरित स्थानके नंतर जोडली जातील. यामध्ये सुभाषचंद्र बोस स्टेडियम, शहीद भगतसिंग गार्डन, मेडितिया नगर आणि साई बाबा नगर यांचा समावेश आहे. गेल्या आठवड्यात, एमएमआरडीएने दहिसर आणि काशीगाव दरम्यानच्या कॉरिडॉर पासून दूर राहण्याचा इशारा दिला होता. २५,००० व्होल्टच्या ओव्हरहेड वायर्समुळे हे घडले. चाचणीपूर्वी हा इशारा देण्यात आला होता. आता वायर्स सुरू झाल्यामुळे, पूर्ण गतिमान चाचणी सुरू होईल. चाचण्यांमुळे ट्रेनची हालचाल, सिग्नलिंग, दळणवळण आणि सुरक्षितता तपासली जाईल.

काशिमीरा स्टेशन हा एक महत्त्वाचा दुवा असेल. ते मीरा रोड पश्चिम रेल्वे स्थानकापासून सुमारे १.४ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे लोकांना वेगवेगळ्या वाहतूक पर्यायांमध्ये स्विच करण्यास मदत होईल. एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, ही लाईन पश्चिम उपनगरांमध्ये प्रवासाचा वेळ ५० ते ७५ टक्क्यांनी कमी करेल अशी अपेक्षा आहे. नवीन लाईन इतर प्रमुख मार्गांशी जोडली जाईल. यामध्ये वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, वेस्टर्न रेल्वे, मेट्रो लाईन २ ए आणि मेट्रो लाईन ७ यांचा समावेश आहे. २०३१ पर्यंत, मेट्रो लाईन ९ दररोज ११.१२ लाख प्रवाशांना घेऊन जाईल अशी अपेक्षा आहे.

दोन आठवड्यात एकूण २४ बांधकामांवर कारवाई

## बनावट नकाशाच्या आधारे बांधलेली आणखी १४ बांधकामे महानगरपालिकेने हटवली

◆ **मुंबई (खास प्रतिनिधी):**

बनावट नकाशाचा आधार घेऊन मढ परिसरात अनधिकृतपणे करण्यात आलेल्या बांधकामांविरोधातील कारवाई मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून अधिक तीव्र करण्यात आली आहे. पी (उत्तर) विभागातील मढ परिसरातील एरंगळ आणि वळणाई येथील १४ अनधिकृत बांधकामे मंगळवारी १३ मे २०२५ रोजी निष्कासित करण्यात आली. मागील दोन आठवड्यात या कारवाई अंतर्गत एकूण २४ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

बनावट नकाशाचा आधार घेऊन मागील वर्षभरात मढ भागात १०१ अनधिकृत बांधकामे उद्‌भवल्याचे निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर, महानगरपालिका उपायुक्त (परिमंडळ-४) डॉ. भाग्यश्री कापसे आणि सहायक आयुक्त (पी उत्तर) कुंदन वळवी यांच्या नेतृत्वात ही तोडक कारवाई हाती घेण्यात आली आहे.

मागील आठवड्यात करण्यात आलेल्या दोन कारवाईत एक बंगला आणि अन्य ९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. ही कारवाई मंगळवारी १३ मे २०२५ रोजी अधिक तीव्र करत १४ बांधकामे निष्कासित करण्यात आली. यापैकी ३ बांधकामे एरंगळ परिसरातील



असून त्यांचे क्षेत्रफळ अनुक्रमे १९००, १७०० आणि ६५० चौरस फूट आहे. उर्वरित ११ बांधकामे वळनाई गावातील असून त्यांचे क्षेत्रफळ प्रत्येकी २०० ते ३०० चौरस फूट इतके आहे. तीन जेसीबी आणि अन्य संयंत्राच्या सहाय्याने सदर अनधिकृत बांधकामांचे पाडकाम करण्यात आले. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे १० अधिकारी-कर्मचारी यांच्यासह पुरेसा पोलिस बंदोबस्त नेमण्यात आला होता.

दरम्यान, बनावट नकाशा प्रकरणातील एकूण १०१ अनधिकृत बांधकामे मे अखेरपर्यंत निष्कासित करण्यात येतील. तोपर्यंत ही मोहीम सुरूच राहील, असे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात येत आहे.

## 'म्हाडा' कोंकण मंडळातर्फे १६ मे रोजी दुसऱ्या जनता दरबार दिनाचे आयोजन

◆ **मुंबई ( प्रतिनिधी) :**

नागरिकांच्या तक्रारींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून म्हाडा मुख्यालयात राबविण्यात येणार्या लोकशाही दिनाप्रमाणे म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ स्तरावर दुसर्या जनता दरबार दिनाचे शुक्रवारी १६ मे, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी दिले होते. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ स्तरावर दुसरा जनता दरबार दिन घेण्यात येत आहे.

कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयातील तिसर्या मजल्यावरील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. जनता दिन उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींबाबत लेखी निवेदन, अर्ज मंडळाकडे दिनांक १६ मे, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## महापालिका माध्यमिक शाळांचा दहावीचा ९२.९२ टक्के निकाल



### यंदा ८९ शाळांचा १०० टक्के निकाल

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या शालांत माध्यमिक अर्थात दहावी (एसएससी) च्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि. १३ मे रोजी जाहीर झाला. मुंबई महापालिकेच्या २४७ माध्यमिक शाळांमधून एकूण १४ हजार ९६६ एवढे विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३ हजार ९०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सरासरी निकाल ९२.९२ टक्के इतका लागला आहे. ८९ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून, ११८ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत.

वरळी सी फेस महापालिका माध्यमिक शाळेमधील अक्षरा अजय वर्मा या विद्यार्थिनीने ९६.८० टक्के गुण मिळवून पालिकेच्या सर्व शाळांमधून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. द्वितीय क्रमांक गजधर पार्क माणेकजी माध्यमिक शाळेची नंदिनी शगुनलाल यादव या विद्यार्थिनीने ९६.२० टक्के गुण प्राप्त करीत पटकावला आहे. तसेच गुंदवली मुंबई पब्लिक स्कूल माध्यमिक शाळेची सेजल शेर बहादूर यादव या विद्यार्थिनीने ९५.६० टक्के गुण प्राप्त करीत तिसरा क्रमांक पटकावला आहे. यावर्षी ११८ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत.

मुंबई महापालिकेमार्फत सन २०२०-२१ मध्ये के पूर्व विभागात मुंबई पब्लिक स्कूल पूनम नगर ही सीबीएसई मंडळाची शाळा सुरू करण्यात आली. सन २०२४-२५ मध्ये सदर शाळेत नैसर्गिक वाढीने इयत्ता १० वी च्या वर्गात एकूण ३८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होते. त्यापैकी १३ विद्यार्थी ८० टक्क्यांहून अधिक श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. मिशबाह फारुखी या विद्यार्थिनीने ९१ टक्के गुण प्राप्त केले.

मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उप आयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या शिक्षण विभागाने यंदा दहावीचा निकाल वृद्धीसाठी नियोजन करुन विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतली. दहावी परीक्षेच्या धर्तीवर शालेय स्तरावर सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात आल्या.

## रस्त्यावर राहणाऱ्या मुलांसाठी फिरते पथक योजना

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' ही सर्वंकष योजना राज्यात नियमित स्वरूपात राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे राज्यातील रस्त्यावर राहणाऱ्या हजारो बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि नवजीवनाची संधी मिळणार असून ही योजना बालहक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकेत प्रत्येकी एक व मुंबई महानगरपालिकेमध्ये पूर्व व पश्चिम उपनगरांसाठी प्रत्येकी एक अशी एकूण ३१ फिरती पथके सुरू करण्यात येणार असून, आगामी काळात याची व्याप्ती राज्यात वाढविण्यात येणार आहे.

या योजनेचा उद्देश रस्त्यावर राहणाऱ्या, एकल, अनाथ व दुर्लक्षित बालकांना समाजाच्या मुख्य



प्रवाहात आणणे, त्यांना शिक्षणाची गोडी लावणे, वैद्यकीय सेवा पुरवणे आणि त्यांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी आवश्यक त्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आहे.

सुरुवातीला मिशन वात्सल्य अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक अशा सहा जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर ही योजना सुरू करण्यात आली होती. याला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विशेषतः बाल स्नेही बस/व्हॅनद्वारे ही सेवा दिली जाणार आहे. या व्हॅनमध्ये समुपदेशक, शिक्षक, महिला कर्मचारी, वाहनचालक व काळजीवाहक अशी चार जणांचे पथक असणार असून बसमध्ये जीपीएस ट्रॅकिंग व सीसीटीव्ही कॅमेरा देखील असणार आहे. मुलांचे सामाजिक अन्वेषण अहवाल तयार करून त्यानुसार त्यांच्या गरजांनुसार वैयक्तिक पुनर्वसन आराखडा तयार केला जाईल. मुलांना वयाप्रमाणे अंगणवाडीत, शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे, त्यांच्या आरोग्याची तपासणी करून लसीकरण, पोषण आहार, औषधोपचार, स्वच्छतेच्या सवयी आणि व्यसनमुक्तीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

## वेचक

### एअर इंडिया मॉडर्न स्कूलचा ९८.८२ टक्के निकाल

**सांताक्रूझ :** माध्यमिक शालांत परीक्षा दहावीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. एअर इंडिया मॉडर्न स्कूल, कलिना, सांताक्रूझ (पूर्व) या



इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा निकाल ९८.८२ टक्के लागला आहे. यामध्ये भार्गवी तुषार घुग्रे ही विद्यार्थिनी ९२.२० टक्के मिळवून प्रथम गुणांनी उत्तीर्ण झाली. अनिरुद्ध ज्ञानेश्वर पडवळ हा विद्यार्थी ९२ % गुणांनी उत्तीर्ण होऊन शाळेत दुसरा आला आहे. कुणाल श्रीकांत काळुगडे हा विद्यार्थी ९१.८० % गुणांनी उत्तीर्ण होऊन शाळेत तिसरा आला आहे. इतर विद्यार्थ्यांनी ही आपल्या मेहनतीने चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. शाळेचे अध्यक्ष शशिकांत साळुंखे व शाळेचे सचिव अशोक भिलारे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका शाहीन पटेल, शाळेच्या पर्यवेक्षिका ज्ञानदा मेस्त्री तसेच शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षकवृंदाचे अभिनंदन केले.

## अकराव्या म्हाडा लोकशाही दिनात ०२ अर्जांवर सुनावणी

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज मंगळवारी वांद्रे (पूर्व) येथील गृहनिर्माण भवनात अकरावा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या लोकशाही दिनात नागरिकांच्या ०२ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. नागरिकाभिमुख दृष्टिकोनातून दोन्ही प्रकरणांमध्ये अर्जदारांना मोठा दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले.

### म्हाडा उपाध्यक्षांचा अर्जदारांना दिलासा

आजच्या लोकशाही दिनात मिलिंद कांबळे यांनी अर्ज केला होता. कांबळे यांना सन २००५ च्या म्हाडा कोकण मंडळाच्या सोडतीत बाळकुम ठाणे येथील योजनेतील सदनिकेसाठी यशस्वी अर्जदार ठरले. सन २०२२ मध्ये सदनिकेची विक्री किंमत भरण्याचे पत्र काही वैयक्तिक कारणास्तव कांबळे यांना उशिरा प्राप्त झाले. कांबळे यांनी सदनिकेच्या विक्री किंमतीचा संपूर्ण भरणा केला. मात्र, सदर विक्री किंमतीचा भरणा विलंबाने केल्यामुळे मंडळातर्फे कांबळे यांना व्याज आकारणीचे पत्र देण्यात आले. सदर व्याज भरू शकत नसल्याने त्याबाबत निर्णयासाठी कांबळे आज लोकशाही दिनात अर्ज केला होता. या अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी कांबळे यांचे सदनिकेची विक्री किंमत भरण्यास विलंब झाल्याबद्दल मंडळातर्फे आकारण्यात आलेले व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला. बाळकुम ठाणे येथील योजनेतील इतर यशस्वी पात्र लाभार्थ्यांच्या सदनिका विक्री किंमतीत कपात करण्याचा ठराव म्हाडाने यापूर्वीच केला आहे. सदर ठरावानुसार सदनिकेच्या विक्री किंमतीत झालेल्या कपातीचा लाभ अर्जदार घेणार नसल्याचे हमीपत्र सदर व्याज माफ करताना कांबळे यांच्याकडून घेण्यात आले.

ओमप्रकाश राठी यांनी दक्षिण मुंबईतील व्ही.व्ही.चंदन रस्त्यावरील इमारत क्रमांक ५२-५४ या उपकरप्राप्त इमारतीतील सदनिका त्यांच्या नावे असताना इतर व्यक्तीच्या नावे करण्यात आल्याबाबत तक्रार अर्ज केला. या अर्जावर आजच्या लोकशाही दिनात सुनावणी देताना जयस्वाल यांनी अर्जदाराने लोकशाही दिन सुनावणी दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून उपमुख्य अभियंता यांच्या स्तरावर १६ मे, २०२५ रोजी तात्काळ सुनावणी घेण्याचे निर्देश मंडळास दिले. आजच्या लोकशाही दिनात म्हाडा मुंबई इमारत दुरूस्ती मंडळ व कोकण मंडळाशी संबंधित प्रत्येकी ०१ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. म्हाडा लोकशाही दिन उपक्रमांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय्य व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून निराकरण करण्यात येत असल्याचे अनुभव अर्जदारांना आले

## श्री नागरदास डी. भुता हायस्कूलमध्ये दहावीचा १०० टक्के निकाल

◆ **अंधेरी (प्रतिनिधी) :**

| | | |
|---|---|---|
| मयुरी मोरे | : | ९६.००% |
| कृष्णा प्रजापती | : | ९५.६०% |
| ओम तिवारी | : | ९३.२०% |

श्री नागरदास डी. भुता हायस्कूलने एक मोठी कामगिरी केली आहे. शाळेने दहावीच्या परीक्षेत १०० टक्के उत्तीर्णता मिळवली आहे, ज्याचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. दहावीच्या परीक्षेला बसलेल्या १८९ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यापैकी ८२ विद्यार्थ्यांनी विशिष्ट श्रेणी, ७१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ३५ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी आणि एका विद्यार्थ्याने उत्तीर्ण श्रेणी गुण मिळवले आहेत.

या विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्यांमध्ये मयुरी रमेश मोरे (९६.००%) शाळेत प्रथम, कृष्णा उमाशंकर प्रजापती (९५.६०%) शाळेत द्वितीय आणि ओम देवीप्रसाद तिवारी (९३.२०%) शाळेत तृतीय क्रमांकावर आहेत. या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपले कौशल्य सिद्ध केले आहे. शाळेचे विश्वस्त शुभेदु भुता म्हणाले, " मला माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांचा खूप अभिमान आहे. त्यांच्या अथक परिश्रमाला आणि अभ्यासू वृत्ती आणि चिकाटीपणाला खरोखरच फळ मिळाले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो." मयुरी मोरे यांनी यशाबद्दलच्या भावना व्यक्त करताना म्हटले की, दहावीच्या परीक्षेतील कामगिरीने ती भारावून गेली आहे आणि तिच्या यशाचे श्रेय तिच्या पालकांना, तिच्या शाळेकडून मिळालेल्या पाठिंब्याला आणि मार्गदर्शनाला जाते तसेच सर्वोत्तम गुण मिळवण्यासाठी तिने केलेल्या मेहनतीचे सार्थक झाले.त्यामुळे ती भारावून गेली आहे.

## गर्डर उतरवण्यासाठी मध्य रेल्वेवर आज, उद्या रात्री कांजूरमार्ग- मुलुंड दरम्यान विशेष पावर ब्लॉक

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मध्य रेल्वे बुधवारी आणि गुरुवारी मध्यरात्री कांजुर मार्ग येथे पाइपलाइन गर्डर उतरवण्यासाठी कांजुर मार्ग-मुलुंड विभागात विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक घेणार आहे. कांजुर मार्ग पाईपलाईन पुलाचे गर्डर रोड क्रेनद्वारे उतरवण्यासाठी कांजुर मार्ग आणि मुलुंड स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर; अप आणि डाऊन जलद मार्गावर आणि पाचव्या मार्गावर हा विशेष वाहतूक पॉवर ब्लॉक असेल.



**ब्लॉकचे तपशील खालीलप्रमाणे:**

ब्लॉक १- बुधवारी रात्री ०१:१५ ते ०३:१५ वाजेपर्यंत २ तासांसाठी हा पावर ब्लॉक असेल .

ब्लॉक २ गुरुवार रात्री घेण्यात येईल हा ब्लॉक १:१५ वाजता ते ३:१५ वाजेपर्यंत २ तास असेल .

या दोन्ही रात्री हा ब्लॉक दरम्यान अप आणि डाउन धीम्या मार्गिका अप आणि डाउन जलद मार्गिका आणि ५व्या आणि ६व्या मार्गिकेवर असेल

या ब्लॉक काळात कांजूर मार्ग आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप आणि डाउन स्लो मार्गावरील सेवा; अप आणि डाउन फास्ट मार्गावरील सेवा आणि पाचव्या आणि सहाव्या मार्गावरील सेवा रद्द केल्या जातील. या दोन्ही दिवशी रात्री या उपनगरीय गाड्या रद्द राहतील .

१. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२४ वाजता सुटणारी ठाणे लोकल रद्द राहणार.


२. ठाणे येथून ०४.०४ वाजता सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल रद्द राहणार.

देखभाल, नवोपक्रमात नवीन मानके केली स्थापित

## पूर्वोत्तर सीमांत रेल्वेच्या नवीन बोंगाईगाव कार्यशाळेचा उपक्रम

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

ईशान्य सीमा रेल्वे अंतर्गत नवीन बोंगाईगाव येथे रेल्वे कार्यशाळा,कोच आणि वॅगन ओव्हरहॉलिंग,पायाभूत सुविधा अंतर्गत नवोपक्रम आणि ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रात सातत्याने नेत्रदीपक कामगिरी केली असून . अलीकडील अनेक उपक्रमांवरून हे स्पष्ट केले आहे की, ही कार्यशाळा प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवर्तनात्मक विश्वासार्हता,आणि टिकाऊपणा वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.



न्यू बोंगाईगाव कार्यशाळेतील प्रमुख सुधारणांपैकी एक म्हणजे डी-कॅल कटिंग प्लॉटर मशीनची स्थापना. या मशीनने कोचच्या बाजू आणि शेवटच्या भिंतींवर अक्षरे लिहिण्यासाठी पूर्वी वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक स्क्रीन-प्रिंटिंग पद्धतीची जागा घेतली आहे. स्क्रीन-प्रिंट केलेले लेबल्स कालांतराने खराब होतात आणि फिकट होतात, त्यामुळे डी-कॅल प्रणाली अधिक टिकाऊ आणि सौंदर्यदृष्ट्या आकर्षक पर्याय प्रदान करते. यामुळे केवळ कोचची दृश्यमानता सुधारत नाही तर त्यांचे दीर्घकालीन देखभाल मानक देखील वाढतात.

आणखी एक महत्त्वाचा विकास म्हणजे रेल्वे डब्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रो-न्यूमॅटिक प्रेशराइज्ड फ्लशिंग सिस्टमचे ओव्हरहॉलिंग पूर्वी ही प्रणाली प्रवासादरम्यान वारंवार बिघाड होत असे आणि 'रेल मदत' सारख्या प्लॅटफॉर्मद्वारे प्रवाशांकडून तक्रारी येत असत. न्यू बोंगाईगाव वर्कशॉपने आता एक व्यापक ओव्हरहॉल प्रक्रिया राबवली आहे, ज्यामध्ये वॉटर प्रेशरायझर युनिट काढून टाकणे आणि सर्व्हिसिंग तसेच कंट्रोल पॅनल, नॉन-रिटर्न व्हॉल्व्ह आणि एअर फिल्टर सारख्या इतर महत्त्वाच्या घटकांची चाचणी समाविष्ट आहे. यामुळे फ्लशिंग सिस्टमची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता लक्षणीयरीत्या सुधारली आहे, विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवर्तनादरम्यान .

पर्यावरणीय शाश्वततेच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत, न्यू बोंगाईगाव वर्कशॉपने १ मेगावॅट रूफ टॉप सोलर प्रकल्प सुरू केला आहे. हवामानाशी संबंधित आव्हाने असूनही, त्याची सरासरी दैनिक उत्पादन क्षमता सुमारे ३८५० केडब्ल्युएच आहे, ज्यामुळे वार्षिक उत्पादन सुमारे १४०५२० केडब्ल्युएचपर्यंत पोहोचते. स्थानिक वितरण कंपनीच्या प्रति युनिट ९. ३९ रुपये दराने वीज खरेदी करून, हा उपक्रम दरवर्षी सुमारे ७१.५ लाख रुपयांची बचत करतो. हे न्यू बोंगाईगावची ऊर्जा खर्च कमी करण्यासाठी आणि हरित उपक्रमांसाठी मदत ठरते.

याव्यतिरिक्त, कार्यशाळेने झाकलेल्या वॅगनच्या छतावरील गळती चाचणी सुविधा विकसित केली आहे. या शॉवर चाचणी पद्धतीमुळे छतावरील गळती आणि बारीक भेगांची अचूक ओळख आणि दुरुस्ती लक्षणीयरित्या सुधारते. कोणत्याही वॅगनमधून गळती होऊ नये म्हणून नियतकालिक ओव्हरहॉल करण्यापूर्वी आणि नंतर वॅगनना आता ही शॉवर चाचणी करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया स्ट्रक्चरल अखंडता सुनिश्चित करते आणि विशेषतः प्रतिकूल हवामानात संपत्तीचे रक्षण करते.

या उपक्रमांद्वारे, इ. सी. रेल्वेची न्यू बोंगाईगाव कार्यशाळा तांत्रिक उत्कृष्टता,ऑपरेशनल विश्वासार्हता आणि शाश्वत विकासात उच्च मानके स्थापित करत आहे.

## डॉ. आशिष सुरेश मंगल यांना मानद डॉक्टरेट प्रदान


◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

डॉ. आशिष सुरेश मंगल यांना युरोपस्थित थीम्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीकडून व्यवसाय व्यवस्थापन आणि वित्त क्षेत्रात मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. हा दुर्मीळ आणि प्रतिष्ठित सन्मान अशा व्यक्तींना दिला जातो, ज्यांनी व्यवसाय आणि मानवतावादी कार्याच्या माध्यमातून समाजात लक्षणीय योगदान दिले आहे. डॉ. मंगल यांच्या उल्लेखनीय उद्योजकीय प्रवासाची आणि सामाजिक प्रभावाची ही मान्यता आहे. थीम्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू म्हणाले,



"डॉ. मंगल यांच्यात फक्त यशस्वी उद्योजक नव्हे तर असा दूरदृष्टीचा नेता दिसतो, जो समाजावर खोल परिणाम करणाऱ्या उद्योगांची उभारणी करतो. डॉ. मंगल यांचे परोपकारी कार्य अतिशय वैयक्तिक आणि व्यापक आहे."

# हिस्टेरेक्टॉमी







हिस्टेरेक्टॉमी ही एक शस्त्रक्रिया आहे, ज्यामध्ये स्त्रीचे गर्भाशय (uterus) शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकले जाते. ही प्रक्रिया महिलांमध्ये विविध कारणांसाठी केली जाते, जसे की गर्भाशयाच्या फायब्रॉइड्स (fibroids), एंडोमेट्रियोसिस (endometriosis), गर्भाशयाचा कर्करोग, जास्त रक्तस्राव, पेल्विक इन्फ्लेमेटरी डिसीज (PID) इत्यादी.

हिस्टेरेक्टॉमी ही वैद्यकीय दृष्टीने गंभीर व विचारपूर्वक केली जाणारी प्रक्रिया आहे, जी रुग्णाच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम करू शकते. म्हणूनच या प्रक्रियेची योग्य माहिती आणि नंतरचा पुनर्वसन कालावधी याची माहिती स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून मी देत आहे.

**हिस्टेरेक्टॉमीचे प्रकार**

हिस्टेरेक्टॉमी प्रक्रिया मुख्यतः तीन प्रकारांनी केली जाऊ शकते:

**१. ॲबडॉमिनल हिस्टेरेक्टॉमी** (Abdominal Hysterectomy)

यामध्ये उदरावर (पोटावर) चीरा करून गर्भाशय काढले जाते. ही पद्धत प्रचलित असून ती मोठ्या फायब्रॉइड्स किंवा कर्करोगासाठी उपयोगात आणली जाते.

**२. व्हॅजायनल हिस्टेरेक्टॉमी** (Vaginal Hysterectomy)

या पद्धतीत गर्भाशय योनीमार्गातून काढण्यात येतो. ही पद्धत कमी वेदनादायक असून, पुनर्वसन कालावधी तुलनेने कमी असतो.

**३. लॅपरोस्कोपिक हिस्टेरेक्टॉमी** (Laparoscopic Hysterectomy)

यामध्ये पोटात छोटे छिद्र करून कॅमेरा आणि सुक्ष्म उपकरणांच्या मदतीने गर्भाशय काढला जातो. ही आधुनिक, कमी आक्रमक (minimally invasive) पद्धत आहे.

हिस्टेरेक्टॉमी का केली जाते?

हिस्टेरेक्टॉमी करण्यामागील मुख्य कारणे पुढीलप्रमाणे असू शकतातः

गर्भाशयाचे फायब्रॉइड्सः ही एक सामान्य आणि सौम्य प्रकारची गाठ असते जी पोटदुखी, रक्तस्त्राव आणि मूत्रमार्गावर दाब निर्माण करू शकते.

अती रक्तस्राव (Menorrhagia): काही महिलांना मासिक पाळी दरम्यान अतिप्रमाणात रक्तस्राव होतो, जो औषधोपचाराने नियंत्रित न झाल्यास हिस्टेरेक्टॉमीचा विचार केला जातो.

गर्भाशयाचा कर्करोग किंवा गर्भाशयमुखाचा कर्करोग

एंडोमेट्रियोसिसः ही एक स्थिती आहे ज्यामध्ये गर्भाशयाच्या आतील अस्तराच्या पेशी गर्भाशयाबाहेर वाढतात.

uterine prolapse: गर्भाशय योनीमध्ये सरकतो, ज्यामुळे मूत्र व लैंगिक समस्या उद्‌भवतात.

शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन काळ

हिस्टेरेक्टॉमीनंतर पुनर्वसन काळ महिला आणि वापरलेल्या पद्धतीवर अवलंबून असतो. सर्वसाधारणपणे:

ॲबडॉमिनल हिस्टेरेक्टॉमीसाठी ६ ते ८ आठवडे लागतात.

व्हॅजायनल व लॅपरोस्कोपिक हिस्टेरेक्टॉमीसाठी ३ ते ४ आठवडे पुरेसे असतात.

**पुनर्वसन काळात घ्यावयाची काळजी:**

**१. आराम :** शस्त्रक्रियेनंतर शरीराला विश्रांती आवश्यक असते. पहिल्या काही आठवड्यांमध्ये अत्यधिक काम, वजने उचलणे टाळावे.

**२. औषधोपचार :** डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमित घ्यावीत. वेदना कमी करण्यासाठी दिलेली औषधे आवश्यक असल्यासच घ्यावीत.

**३. आहार :** हलका, पचायला सोपा आणि पोषक आहार घ्यावा. लोहयुक्त पदार्थ, फळे, भाज्या यांचा समावेश करावा.

**४. व्यायाम :** सुरुवातीला फक्त सौम्य चालणे, नंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने हलके स्ट्रेचिंग आणि व्यायाम सुरू करावेत.

**५. मानसिक स्वास्थ्य :** काही महिलांना गर्भाशय काढल्यामुळे नैराश्य, मानसिक तणाव जाणवू शकतो. त्यामुळे कुटुंबीयांचा आधार, मानसिक समुपदेशन किंवा ग्रुप थेरपी उपयोगी ठरू शकते.

**६. पुनः नियमित जीवनशैली :** अनेक महिला शस्त्रक्रियेनंतर एक-दीड महिन्यांत आपले नियमित कार्य पुन्हा सुरू करू शकतात. मात्र, शरीराच्या सिग्नल्सकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

हिस्टेरेक्टॉमी ही गंभीर आणि जबाबदारीने घेतली जाणारी प्रक्रिया आहे. ती केवळ तात्पुरता त्रास कमी करण्यासाठी नव्हे, तर दीर्घकालीन आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. योग्य कारणांसाठी, प्रशिक्षित गाईडन्सखाली व योग्य काळजी घेतल्यास, ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडते आणि रुग्णाला आरोग्यदायी जीवनाकडे परत जाता येते. एक स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून, मी सर्व महिलांना आवाहन करते की, शस्त्रक्रियेबाबत घाबरू नका, पण तिची सखोल माहिती घेऊन योग्य निर्णय घ्या.

drsnehalspatil@gmail.com

# "कलाकृषीतील "संपदा"



## कर्तृत्ववान ती राज्ञी




अत्यंत लोभस व्यक्तिमत्व लाभलेली, गेली ३० वर्ष लेखन, निवेदन, नृत्य ,नाट्य दिग्दर्शन क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारी, कृषीक्षेत्रात आनंदाचे शेत निर्माण करणारी "संपदाताई जोगळेकर कुळकर्णी" यांचा कलाक्षेत्र ते कृषी क्षेत्रातील वेगळ्या वळणवाटा जोखणारा प्रेरणादायी व तितक्याच आनंददायी प्रवासाची आज आपण सफर करणार आहोत. कलाक्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वानंतर त्यांनी कृषी क्षेत्रात पाऊल ठेवत मातीशी असणारी आपली नाळ अधिक घट्ट केली. त्यांच्या या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा पाया घडला तो आजी, आई आणि वडिलांच्या प्रभावातून. आजीकडून त्यांनी शिवणकाम व कलात्मक वस्तू बनवण्याची कला घेतली, आईकडून स्पष्ट भाषणशैली आणि शिक्षकवृत्ती, तर वडिलांकडून कलाप्रेम आणि जबाबदाऱ्या. अशा मध्यमवर्गीय कुटुंबातील संपदाताईंवर कुटुंब वत्सलतेचे संस्कार आपसूकच रुजले.

शालेय जीवनातच त्यांनी वक्तृत्व आणि बालनाट्य स्पर्धांमध्ये भाग घेऊन कलाक्षेत्रातील चुणूक दाखवून दिली. महाविद्यालयीन काळात एकांकिका स्पर्धा तसेच सुप्रसिद्ध नर्तक गोपीकृष्ण यांचे शिष्य डॉ. केतकर यांच्याकडे २२ वर्ष व मंजिरी देव यांच्याकडे दोन वर्ष नृत्याचे धडे गिरवत कथ्थक विशारद ही पदवी संपादन केली. त्यासोबतच मुंबई विद्यापीठातील मराठी या विषयात एमए केले व सौंदर्यशास्त्र हा मुख्य विषय घेऊन त्याच्यातही त्यांनी फर्स्ट क्लास मिळविला. कला क्षेत्रात करिअर करत असताना शैक्षणिक पदवी ही तितकीच महत्त्वाची! आई-वडिलांनी सांगितलेल्या या वाक्याचे महत्त्व जाणून घेत त्यांनी दोन्ही क्षेत्रातील पदवी मिळवत स्वतःला सिद्ध केले.

'आईचं घर उन्हाचं' या पहिल्याच व्यावसायिक नाटकाने रंगभूमीवर त्यांची ठसठशीत छाप पडली. त्याच काळात लेखन, कविता, नाटक लेखन आणि दिग्दर्शनाने त्यांच्यातील सृजनशीलतेचा छंद अधिक बहरत गेला. कलाक्षेत्रात भरारी घेत असतानाच त्यांचे लग्न कलेवर व त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून पदवी संपादन करत जाहिरात क्षेत्रातील मल्टिनॅशनल कंपनीत उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या राहुल कुळकर्णी यांच्याशी झाला. सासरी आल्यानंतर नाट्यक्षेत्राबद्दलचे गैरसमज दूर करत त्यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत आपले कलाजतन सुरू ठेवले. दूरदर्शनवरील कार्यक्रम, निवेदन माध्यमातून त्यांनी आपले स्थान बळकट केले.

नवऱ्याच्या व सासरच्या प्रोत्साहनानेच'सोबत संगत', 'किमयागार' अशा नाटकांचे लेखन-दिग्दर्शन करत त्यांनी रंगभूमीवर लेखिका आणि दिग्दर्शिका म्हणूनही नाव कमावले. कला ही त्यांच्यासाठी फक्त करिअर नव्हे तर आत्मअभिव्यक्तीचे माध्यम ठरले. कोणतीही स्पर्धा न ठेवता केवळ त्याच्यातून स्वतःला मिळणाऱ्या आनंदासाठी व स्वतःबरोबर इतरांना वाटता येणाऱ्या आनंदासाठी त्यांनी आपले काम सुरु ठेवले.

त्यानंतर २००३ पासून त्यांच्या कृषी क्षेत्रातील वाटचालीला सुरुवात झाली. कोकणातील शेतीत त्यांनी हळूहळू पाय रोवले. कोणताही पारंपरिक अनुभव नसताना केवळ चिकाटी आणि कष्टावर विश्वास ठेवून त्यांनी दोघांनी मिळून स्वतःच्या कष्टातून शेती उभी केली. प्रसंगी कोकणातील वळणावळणाच्या रस्त्यांवर आठ-आठ तास एकटीने प्रवास करत, शेतीचा अभ्यास करत त्यांनी एक नैसर्गिक शेतीचे उदाहरण देत रत्नागिरी जिल्ह्यात संगमेश्वर येथील फुणगुस येथे "आनंदाचे शेत'" साकारले –

पैसे मिळवणं हा व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता निसर्गाच्या सानिध्यात राहून शेतीत रासायनिक प्रक्रिया न करता तांदूळ, कुळीथ, नाचणी, पावटा, तीळ, हळद, यांची लागवड करून आंबा, काजूच्या बागा तयार केल्या. शेती विषयक माहिती मिळवत तिथली अनुभव संपन्न माणसं सोबत घेऊन, कृषी तज्ज्ञांचं मार्गदर्शन घेत कलाकार ते शेतकरी हा प्रवास टप्प्यात पार केला.

अनेक आव्हाने झेलत सुरुवातीला शहरातून गावात राहण्याचा बदल स्वीकारला. आत्ताच्या टेक्नॉलॉजीच्या युगात आपण सर्व माहितीने अद्यावत असलो तरी आपल्या ताटात येणाऱ्या अन्नाबद्दल आपल्याला संपूर्ण माहिती असणं गरजेचं आहे. त्याबद्दलची जागरूकता निर्माण व्हावी मुलांवर पौष्टिक मूल्य असणाऱ्या अन्नाचे संस्कार व्हावेत याकरिता"अन्नभान" उपक्रमातून रसायनविरहित अन्नाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्यही त्यांनी हाती घेतले आहे. 'कलामोहोर' या कलाविषयक उपक्रमातून कलाकारांच्या व त्यांच्या कलेच्या सानिध्यात तीन दिवस राहण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. विशेष म्हणजे यावर्षी साहित्यिका मंगला गोडबोले यांच्या सहवासाने सगळे वातावरणच मंत्रमुग्ध झाले. संपदाताईंचा शेतीतील अनुभवाचा लाभ समाजातील महिलांना देण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आल्या. इतर क्षेत्रांप्रमाणेच शेती हे सन्मानाचे क्षेत्र आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

त्यांची कन्या शर्वरी हिने सुद्धा नाट्यकलाक्षेत्रात तिची मोहोर उमटवली आहे . संपदा ताईंचा प्रवास पाहत ती मोठी झाली. तिच्या संगतीने आई म्हणून, मार्गदर्शक म्हणून, आणि सखी म्हणून संपदाताई तिच्या सोबतच घडत गेल्या. त्यांनी घर, करिअर सोबत कलेचा वारसा जपला.पती राहुलजींचे प्रोत्साहन आणि कुटुंबाचा पाठिंबा यामुळेच त्या कलाक्षेत्रातील यशस्वीता ठरल्या आणि शेती, कृषी पर्यटन हे प्रामुख्याने त्यांचे पती राहुलजींच्या पुढाकारातून, त्यांनी समर्पित भावनेने केलेल्या कष्टातून, बघितलेले स्वप्न दोघांनी मिळून साकार केले. कितीही अडचणी आल्या आव्हाने आली तरीही त्याचं टेन्शन घेऊन न थांबता सातत्याने मार्गक्रमण करत राहणे व आपल्या सोबत आपल्या कुटुंबाला देखील प्राधान्य देत प्रत्येकाने आपल्याला आनंद देणार आनंदाचे शेत शोधण्याचा मोलाचा सल्ला संपदाताई सगळ्यांना देतात.

''Think Enough" हे त्यांचे ब्रीदवाक्य कायम मार्गदर्शक ठरले. कलाक्षेत्रातील संवेदनशीलता आणि कृषीतील वास्तव दोन्ही आत्मसात करत त्यांनी जीवन एक उत्सव बनवला. शेतीच्या मातीतील आनंद आणि रंगभूमीवरील टाळ्यांचा गजर यांचा संयोग म्हणजेच संपदाताई – एक खरी 'कर्तुत्ववान राज्ञी'.

Vaishu.gaikwad78@gmail.com

# बँगल्सचाच धमाका!

## पारंपरिक लूक ते मॉडर्न ट्विस्ट!




हिंदू धर्मात बांगड्यांचे महत्त्व फार पूर्वीपासून सांगण्यात आले आहे. सणाच्या दिवशी बाजारात अनेक प्रकारच्या सर्वाधिक बांगड्या खरेदी केल्या जातात. पण आजकालचा बदलता ट्रेंड पाहता महिलांनीही सोन्याच्या बांगड्या न घालता आर्टिफिशिअल बांगड्या घालायला सुरुवात केली आहे. याचे कारण असे की तुम्ही तुमच्या आऊटफिटवर अगदी मॅच होणाऱ्या बांगड्या किंवा वेगवेगळ्या डिझाईन्सच्या बांगड्या घेऊन घालू शकतात. सणावाराच्या दिवसांमध्ये साडी किंवा ड्रेस परिधान केल्यानंतर महिला व मुली हातामध्ये सुंदर सुंदर बांगड्या घालतात. बांगड्या घातल्याने हाताचे सौंदर्य खुलून येते. ब्रेसलेट, आर्टिफिशिअल, चांदी, ऑक्सिडाइज्ड इतकंच काय तर आता लग्नसराईमध्ये नवरीसाठी ब्रायडल लटकन बँगल्ससुद्धा बाजारात उपलब्ध आहेत. आज आम्ही तुम्हाला या लेखातून बँगल्सच्या नवनवीन डिझाइन्स सांगणार आहोत. ज्या तुम्ही सहजपणे साडी, ड्रेस, घागरा यावर घालू शकता.




### १. पर्ल गोल्ड प्लेटेड बांगड्या



अतिशय सुंदर असे हे कडे ट्रेडीशन साडी किंवा ड्रेसवर घालू शकता. हे कडे लाल आणि हिरव्याचं रंगाचे असतात. यात गोल मोती असतात. हे दोन कडे तुमच्या हाताचं सौंदर्य नक्कीचं वाढवतील.

### २. मोत्यांच्या बांगड्या

मोत्यांच्या बांगड्याचा सेट हा ट्रेडिशनल ड्रेसवर सुट होतो.



हे असे ब्रेसलेट आहे जे अगदी बांगड्यांसारखे दिसतात. म्हणजे यामुळे बांगड्या घालायची गरज नाही. तुम्ही तुमच्या महागड्या आउटफिट्सवर या प्रकारच्या रॉयल बांगड्या कॅरी करू शकता. हे ब्रेसलेट दगड आणि रत्नांनी जडलेले आहे आणि त्याच्या कडांवर डिझायनर डिझाइन आहे. यामुळे त्यांनी हे आणखी सुंदर बनवते.

### ३. पारंपरिक बांगड्या



पारंपरिक अशा बांगड्या या कोणत्याही साडीवर शोभून दिसतात. साडीवर किंवा ट्रेडिशनल ड्रेसवर तुम्ही या बांगड्या घालू शकता.

### ४. सोनेरी जाळीदार तोडे



नववधू असो किंवा बाकी महिला मंडळी यांना प्रत्येक साडीवर सोनेरी जाळीदार तोडे हातात घालायला आवडतात. सोनेरी तोडे हमखास बाजारात अगदी स्वस्त दरात मिळून जातील. अशातच या तोड्यांची स्टाईल ही कायमस्वरूपी महिलांची पहिली पसंद आहे. त्यामुळे या सोनेरी तोड्यांना मार्केटमध्ये खूप मागणी आहे. विशेष म्हणजे तोडे हातात घातल्यावर एक भरजरीत अनोखा लूक हातांना मिळतो.

### ५. हिरवा चुडा



महाराष्ट्रीय लग्नातील दागिन्यांची फॅशन ही हिरव्या बांगड्यांशिवाय पूर्ण होत नाही. नवरीच्या हातात भरभरून हिरव्या बांगड्या घातल्या जातात आणि या बांगड्या घालण्याची परंपरागत रीतही आहे. हिरव्या बांगड्यांच्या मागे पुढे तोडे किंवा पारंपरिक कडे घालतात.

### ६. ऑक्सिडाइज्ड बांगड्या



आर्टिफिशिअल गोल्ड सोबतच ऑक्सिडाइज्डच्या बांगड्यासुद्धा ट्रेंडिंग आहेत. जर तुम्हाला तुमच्या हातांचे सौंदर्य वाढवायचे असेल तर तुम्ही या अशा घुंगरू बांगड्या घालू शकता. ऑक्सिडाइज्डमध्ये सुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या डिझाइन्स असतात जस की तोडे, घुंगरू, जाळी डिझाइन, स्टोन वर्क या बांगड्या हातामध्ये घातल्यानंतर खूप सुंदर दिसतात. तुमची साडी किंवा ड्रेस वेस्टर्न असेल, तर ऑक्सिडाइज्डच्या ज्वेलरी सोबत या बांगड्या तुम्ही घालू शकता.

### ७. मखमली बांगड्या चुडा सेट



भारतातील अनेक संस्कृतींमध्ये, लग्नाच्या दिवसापासून सुमारे एक वर्षापर्यंत वधूला लाल, पिवळा, गुलाबी इत्यादी शुभ रंगांच्या बांगड्या घालण्याची परंपरा आहे. ही रचना चुडा सेटचे आकर्षण देते, ज्यामध्ये टोकांवर जड आरशाचे काम आणि मणी असलेल्या बांगड्या आणि मध्यभागी लाल मखमली बांगड्या असतात. ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही बाजारपेठांमध्ये तुम्हाला असे बांगड्या सेट सहज सापडतात.

### ८. राजस्थानी चुडा



महिला आणि मुलींसाठी सुंदर मोर पितळी कडा असलेला राजस्थानी पारंपरिक वधू चुडा सेट नवरीसाठी उत्तम आहे. तुम्ही लग्न, उत्सव किंवा कोणत्याही घागऱ्यावर हा चुडा घालू शकता त्याच्यामध्ये तुमच्या आऊटफिटच्या रंगाच्या वेलवेट बांगड्या घालू शकता.

# सांडगे पापडाची आमटी




सांडगे पापडाची आमटी ही महाराष्ट्रातील पारंपरिक आणि चविष्ट डिश आहे, जी विशेषतः उन्हाळ्यात किंवा पावसाळ्यात भाजीच्या अभावात बनवली जाते. सांडगे हे विविध डाळींच्या मिश्रणापासून बनवलेले, वाळवलेले असतात, जे वर्षभर टिकतात. या आमटीत सांडग्यांसोबत उडीद पापड, शेंगदाण्याचा कूट, गोडा मसाला, लसूण आणि इतर मसाल्यांचा वापर करून एक झणझणीत आणि पौष्टिक जेवण तयार होते. ही आमटी भात, पोळी किंवा भाकरीसोबत अप्रतिम लागते.

**साहित्यः**

१ कप सांडगे, ४-५ लहान उडीद पापड (किंवा पोह्याचे मिरगुंड)
१ मध्यम कांदा (बारीक चिरलेला)
१ मध्यम टोमॅटो (बारीक चिरलेला)
७-८ लसूण पाकळ्या (चिरून)
७-८ कढीपत्ता
१ टीस्पून गोडा मसाला
१ टीस्पून लाल तिखट
१/२ टीस्पून मोहरी
१/२ टीस्पून जिरे
१/२ टीस्पून हिंग
१-२ टीस्पून शेंगदाण्याचा कूट
मीठ चवीनुसार
लसूण आणि कांद्याची पेस्ट (ऐच्छिक), लसूण आणि कांद्याचा मसाला (ऐच्छिक)
तेल, गरम पाणी
कोथिंबीर आणि ओल्या नारळाचा कीस (सजावटीसाठी)



**सजावट :** आमटी तयार झाल्यावर वरून कोथिंबीर आणि ओल्या नारळाचा कीस घालून सजवा.

**कृती :**
- कढईत थोडे तेल गरम करून सांडगे हलक्या आचेवर सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या.
- तळलेले सांडगे बाजूला काढा.
- उडीद पापड तुकडे करून त्याच तेलात कुरकुरीत तळून घ्या.
- त्याच कढईत थोडे तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग आणि कढीपत्ता घाला.
- मोहरी तडतडल्यावर लसूण आणि कांदा घालून कांदा सोनेरी रंगाचा होईपर्यंत परतून घ्या.
- टोमॅटो घालून ३-४ मिनिटे परतवून घ्या. गोडा मसाला, लाल तिखट, शेंगदाण्याचा कूट आणि मीठ घालून सर्व मिश्रण परतवून घ्या.
- तळलेले सांडगे आणि पापडाचे तुकडे घालून सर्व मिश्रण चांगले मिसळा. आमटीला आवश्यक गरम पाणी घालावे.
- कुकरमध्ये २ शिट्ट्या होईपर्यंत शिजवा किंवा झाकण ठेवून १०-१२ मिनिटे शिजवा.

**टिप्सः**
- सांडगे घरी बनवण्यासाठी चणा डाळ, मूग डाळ आणि उडीद डाळ वापरून मिश्रण तयार करा त्यात जिरे, मीठ लाल तिखट घालून मिक्स करून छोटे गोळे बनवा आणि उन्हात २-३ दिवस वाळवा.
- गोडा मसाल्याऐवजी कांदा-लसूण मसाला वापरल्यास आमटीला अधिक झणझणीत चव येते.
- आमटीमध्ये खोवलेला नारळ घालून चव वाढवू शकता.ही आमटी भात, पोळी किंवा भाकरीसोबत सर्व्ह करा.

# मुद्रा भाग १






मागील दोन लेखांत आपण विशेषेकरून आसन-प्राणायाम यांविषयी मनात निर्माण होणारे काही प्रश्नं आणि त्यांची उत्तरं पाहिली. पुढील दोन लेखांत योगपरंपरेतील एका महत्त्वाच्या विषयासंबंधी आपण माहिती करून घेणार आहोत. हा विषय म्हणजे मुद्रा.

मुद्रा म्हणजे चिह्न किंवा प्रतीक. आसन आणि सूक्ष्म व्यायामाशी मुद्रा वरकरणी सारख्या दिसतात, मात्र मुद्रांमुळे शरीरावर होणारा परिणाम अधिक सूक्ष्म व दूरगामी असतो. यामुळे जणू योगविद्येचं प्रतीक याअर्थी मुद्रा हा शब्द योजलेला दिसतो.

मुद्रा या शब्दाची व्युत्पत्ती 'मुद्' म्हणजे आनंदित होणे या संस्कृत क्रियापदापासून सांगितली जाते. मुद्रांचा अभ्यास केल्यानं शरीर अधिक सुदृढ होतं आणि अंतस्त्रावी ग्रंथींचं कार्य सुधारतं. या सगळ्याचा परिणाम म्हणजे शरीर आणि मन आनंदित राहतं. म्हणून 'शरीर आणि मनाला आनंद देणाऱ्या' अशा अर्थीही मुद्रा हा शब्द समर्पक आहे.


आसनांमुळे आपल्या शरीरातील सांधे व स्नायू लवचिक आणि कार्यक्षम होतात. प्राणायामामुळे श्वसनसंस्थेचं कार्य सुधारतं. मनावरही काही अंशी ताबा मिळवता येतो; परंतु शरीरामध्ये याहीपेक्षा अधिक सूक्ष्म स्तरावर काम करणाऱ्या ग्रंथी असतात ज्यांना अंतःस्त्रावी ग्रंथी असं म्हणतात. अंतःस्त्रावी ग्रंथी, मेंदू, हृदय, रक्तवाहिन्या आणि रक्तदाब यांचा एकमेकांशी अतिशय निकट संबंध आहे. यांपैकी कोणत्याही एकामध्ये बिघाड झाला, तर शरीराचं संतुलन बिघडतं आणि शरीरात दोष निर्माण होतात. म्हणूनच अंतःस्त्रावी ग्रंथींना कार्यक्षम ठेवण्यासाठी योगपरंपरेत मुद्रांचं अत्यंत महत्त्व आहे. मुद्रांमधील शारीर स्थिती आसनांसारखीच असली तरी मुद्रा केवळ शरीरावरच नाही तर अंतःस्त्रावी ग्रंथींवर सकारात्मक परिणाम करतात आणि अंतःस्त्रावी ग्रंथींची कार्यक्षमता वाढवतात. याचा परिणाम शरीरातील पचन-श्वसनादी संस्थांचं संतुलन राखण्यासाठी होतो.

पतंजलींनी आपल्या योगसूत्र या ग्रंथामध्ये मुद्रांचा निर्देश केलेला नाही; परंतु पतंजलींनंतर योगपरंपरेत रचलेल्या ग्रंथांमध्ये, विशेषतः हठयोगाच्या ग्रंथांमध्ये मात्र मुद्रा हा विषय हाताळलेला दिसतो. हठयोगातील मुद्राभ्यासाचं प्रयोजन कुंडलिनीशक्ती जागृत करणं असं आहे. त्यामुळे मुद्रांना हठयोगात विशेष महत्त्व आहे. अर्थातच सध्याच्या काळात स्वतःला सुदृढ ठेवणं इतकाच मुद्राभ्यासाचा मर्यादित उद्देश ठेवणं योग्य ठरेल.

कोणालाही सहज करता येण्याजोग्या आणि नित्य योगसाधनेत अवश्य अंतर्भाव करावा अशा काही मुद्रा पुढीलप्रमाणेः

मुद्रांपैकी काही मुद्रा केवळ हातानं केल्या जातात. हस्तमुद्रांपैकी अंगुलीमुद्रेची माहिती प्राणायामाच्या लेखात दिली होती. ध्यानात्मक आसनं करताना हस्तमुद्रांचा उपयोग केला जातो.

१. द्रोणमुद्रा - या मुद्रेमध्ये ध्यान करताना हातांचा द्रोणासारखा आकार करून हात गुडघ्यावर ठेवले जातत.



२. ध्यानमुद्रा - पद्मासनादी ध्यानात्मक आसन करताना दोन्ही हातांचे तळवे एकमेकांवर ठेवून ते पायांच्या टाचांवर ठेवतात. या मुद्रेमुळे ध्यान करताना शरीराला आवश्यक असलेली स्थिरता प्राप्त होते.



३. ज्ञानमुद्रा - या मुद्रेमध्ये अंगठा आणि हाताच्या पहिल्या बोटांची अग्रं एकमेकांना जुळवली जातात आणि दोन्ही बोटांचा हलकासा दाब एकमेकांवर दिला जातो. इतर तीन बोटं सरळ ठेवली जातात. ध्यानात्मक आसनं किंवा प्राणायाम करताना ह्या मुद्रेचा उपयोग होतो.

मस्तक, चेहरा, कंठ, मान या शरीरातील भागांशी संबंधित मुद्रा पुढीलप्रमाणेः

४. सिंहमुद्रा - या मुद्रेमध्ये चेहऱ्याचा आकार सिंहाप्रमाणे दिसत असल्यामुळे तिला सिंहमुद्रा असं म्हणतात.

कृती :

१. पद्मासन, वीरासन किंवा कोणत्याही बैठकीच्या आसनात ताठ बसावं. अथवा खुर्चीत बसून किंवा कमरेवर हात ठेऊन, पायात अंतर घेऊन उभं राहावं

२. हात कोपऱ्यात सरळ ठेऊन गुडघ्यावर द्रोणमुद्रेत ठेवावेत.

३. जितका जमेल तितका जबडा उघडावा. दात दिसतील इतके ओठ वर खाली न्यावेत.

४. जीभ बाहेर काढून हनुवटीच्या दिशेनं वळवावी.

५. हनुवटी जास्तीत जास्त खाली नेऊन छातीला चिकटवावी.

६. दृष्टी वरच्या बाजूनं वळवावी किंवा जमत असेल तर भूमध्यामध्ये स्थिर करावी. ही सिंहमुद्रेची अंतिम स्थिती आहे.

७. अंतिम स्थितीत श्वसन रोखण्याची स्वाभाविक प्रवृत्ती होऊ शकते म्हणून श्वासोच्छ्वास जाणीवपूर्वक नियमित चालू ठेवावा.

लाभ -

१. जीभ लवचिक होते.

२. घशाला होणारे त्रास कमी होतात.

३. रक्तदाब संतुलित ठेवण्यासाठी या मुद्रेचा नित्याभ्यास उपयुक्त ठरतो.

४. थायरॉईड ग्रंथींचं कार्य सुधारते. त्या अधिक कार्यक्षम बनतात.

५. डोळ्यावरील आणि चेहऱ्यावरील ताण नष्ट होतो. ताजतवान वाटतं

६. चेहऱ्याच्या भागातील रक्ताभिसरण वाढल्यामुळे चेहऱ्याचा तजेला वाढतो, चेहऱ्याच्या त्वचेचं आरोग्य सुधारतं व त्वचेचा फिकेपणा नाहीसा होतो. (फेशियल करण्याचे सर्व फायदे या मुद्रेनं प्राप्त होतात.)

निषेध –

घशाला किंवा जाबड्याला सूज अथवा वेदना असेल तर सिंहमुद्रा करू नये.

इतर मुद्रांचा विचार पुढील भागात करू.

# भक्त नको अनुयायी बनावे

**भिक्खु रेवतबोधी** | **परळी शहरात बुद्ध पौर्णिमा**





पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:बीड जिल्ह्यातील परळी वै. शहरात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दि. १२ मे २०२५ रोजी २५६९ वी बुद्ध जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली. यावेळी भव्य धम्म रॅली , धम्म देसना कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. १२ मे २०२५ रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. या जयंती उत्सवानिमित्त परळी वै. शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर ते परळी वै. रेल्वे स्थानक परिसरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ समारोप करण्यात आला. व त्यानंतर रेल्वे स्थानकासमोरील मैदानात पुज्य भिक्खु रेवतबोधी यांच्या धम्मदेसनेचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे परळी तालुकाध्यक्ष हनुमंत वाघमारे सर होते. यावेळी पुज्य भिक्खु रेवतबोधी यांचे स्वागत महादु सरवदे भारतीय बौद्ध महासभेचे जेष्ठ कार्यकर्ते तथा माजी मुख्याध्यापक यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष हनुमंत वाघमारे सर यांचे स्वागत बाबासाहेब पाचांगे सर , भा.बौ.महा.ता. हिशोबणीस यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षाचे सुचक जयपाल पाचांगे ,भा.बौ.महा.परळी वै. ता. संरक्षण सचिव, अनुमोदन योगेश मुंडे, भा.बौ.महा.परळी वै. ता. प्रचार पर्यटन उपाध्यक्ष यांनी केले . पुज्य भिक्खु रेवतबोधी यांना क्षमा याचना व त्रिसरण पंचशील याचना जे.के. कांबळे सर भा. बौ.महा. ता. संस्कार उपाध्यक्ष यांनी केली तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वप्नील महाळंगीकर ,भा. बौ. महा. जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष तथा डिव्हीजन ऑफिसर समता सैनिक दल यांनी केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचलन यशपाल बचाटे भा.बौ. महा. ता. सरचिटणीस परळी वै. यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नी. प्रजावतीताई कांबळे , भा.बौ.महा. शहराध्यक्षा परळी वै. यांनी केले. कार्यक्रमाला भा.बौ.महासभा जिल्हा शाखेच्या वतीने प्रा.डॉ.आर.डी.आचार्य सर जिल्हा संस्कार सचिव व नी.रुक्मिणीताई जोंधळे जिल्हा संघटिका पान २ वर

# संभाजी राजेंचे विचार आत्मसात करा

**श्रीमती कांबळे:**गेवराई पंचायत समितीत जयंती



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:छत्रपती संभाजी महाराज हे शौर्य, विद्वत्ता आणि स्वाभिमानाचे सर्वोच्च प्रतीक होते. प्रत्येकाने छत्रपती संभाजी महाराजांचे विचार आत्मसात करुन त्यांच्यासारखे वागावे त्यांनी दाखवलेला स्वाभिमान आणि देशासाठी केलेला त्याग, आपल्याला प्रेरणा देतो आणि समाजाला चांगले बनण्यास मदत करतो. हा केवळ उपदेश नसून, जीवन जगण्याचा एक प्रेरणादायी मंत्र आहे. असे प्रतिपादन गटविकास अधिकारी श्रीमती मीना कांबळे यांनी व्यक्त करुन एका छोट्याशा वाक्यात दिलेला संदेश आहे.

गेवराई येथील पंचायत समिती, कार्यालयात बुधवार दि.१४ मे रोजी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम छत्रपती संभाजी राजेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. दरम्यान यावेळी त्यानी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सहा, गटविकास अधिकारी संजय गायकवाड , सुनील थोरात, लेखा विभागाचे सय्यद, नरेगा विभागाचे एपिओ अरविंद माळदकर, सचिन गिरी , पत्रकार वैजीनाथ जाधव , देशमुख, तळेकर, सचिन पंडित , यश इनकर, धनंजय पंडित, विशाल पांढरे, रोकडे सुंदर , उत्तम तौर, अनेराव, ओएस नायगावकर सह आदी कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे म्हणाल्या की , छत्रपती संभाजी महाराज पान २ वर

# समाज कल्याणचा निधी वळवू नये

**नानासाहेब घोडके:** प्रशासनाला दिले निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड व डॉ. शांताराम कंराडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघ बीड च्या वतीने दि. १४/५/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री दादा अजित पवार, समाज कल्याण मंत्री संजयजी शिरसाट साहेब यांना उपजिल्हाधिकारी माजलगाव यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले की, समाज कल्याण विभागाचा निधी हा मागासवर्गीय समाजाच्या विविध योजना राबविण्यासाठी व त्या मागे मागासवर्गीय समाजांचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला असतो व तो देखील पुर्णपणे नसतो, या वर्षातील बराचसा निधी गेल्या महिन्यापासून इतर योजनांसाठी इतर विभागाकडे वळवण्यात आला आहे हे आम्हस वृत्तपत्र, टीव्ही व समाज कल्याण मंत्री यांच्या प्रसारमाध्यमांतील वक्तव्यावरून निदर्शनास आले आहे, त्यामुळे समाज कल्याण खात्या अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनांवर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. तसेच समाज कल्याण मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनावर त्याचा पुरोगामी परीणाम होणार आहे. समाज कल्याण खात्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिकणाऱ्या मुलांची बार्टीच्या मार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती, आश्रम शाळा निधी, विद्यार्थी प्रशिक्षण निधी, तसेच मागासवर्गीयांच्या विविध कर्ज योजना इत्यादींवर व मागासवर्गीय समाजावर अन्याय होणार आहे. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ यांच्याकडून मंजूर कर्ज प्रकरणे सहभाग भरलेले कर्ज प्रकरणाचे तात्काळ वाटप करण्यात यावे. सन २०२३-२४ मधील कर्ज प्रकरणांना तात्काळ मंजुरी देण्यात यावी. तसेच बार्टी व आर्टी च्या धर्तीवर संत रोहिदास संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात यावी त्याच प्रमाणे संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे पुर्ण कर्ज माफ करण्यात यावे. तरी मागासवर्गीय समाजावर होणारा अन्याय दुर करुन निधीचे वितरण पूर्ववत समाज कल्याण विभागाला करण्यात यावे अशा प्रकारे समाजकल्याण खात्याचा निधी इतर खात्यात वळविण्याच्या घटना पुढे होऊ देऊ नयेत निवेदनात करण्यात आलेल्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात हि विनंती हे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या पान २ वर

# चिंचोली माळीमध्ये बस थांबेना!

**सवाल:**केज आगाराचा भोंगळ कारभार

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:येथील एसटी महामंडळाचा भोंगळ कारभार सुरू आहे कारण चिंचोली माळी मध्ये बस थांबा फलक असताना सुध्दा नांदुर केज मार्गी जानारी बस थांबत नसल्याचे नागरिकांना मध्ये प्रवाशा मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे त्यामुळे प्रवाशांना खुप मोठा अडथळा निर्माण होतो आहे बस थांबली नाही तर शाळेतील विद्यार्थ्यांना,वयवृध्द नागरिकांना खुप मोठा अडथळा निर्माण होतो आहे त्यामुळे बसस्थानकातील कर्मचारी डेपो मॅनेजर यांना शासनाने पगार काय मोकळी बस फिरवण्यासाठी बस दिल्या आहेत का असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण बस ही दळणवळण करण्यासाठी आहे परंतु केज ते नांदुर बस मात्र चिंचोली माळी येथे थाबत नसल्याने नागरिकांना प्रवाशांचे हाल होत आहेत तरी संमधीत प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज आहे.व बस चालकांचा मनमानी कारभार बंद केला पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.



परळी: येथील अक्षदा मंगल कार्यालयात भास्कर सोनवणे यांची ज्येष्ठ सुपूत्री डॉ.पूजा सोनवणे आणि डॉ सचिन जायभाये यांच्याशी संपन्न झालेल्या विवाहाप्रसंगी शुभेच्छा देतांना निलेश देशमुख, संतोष नायक, केदार सारडा, गुलाम मुजिब, जगजीवन लव्हराळे, भगवान साकसमुद्रे, संतोष जोगदंड, डॉ.नामदेव आघाव, मनोज काबरा, मारोती कदम, महेश पैंजणे आदी.

# माध्यमिक परीक्षेत मिळविले यश

**अभिनंदनिय:**रमेश रोडेने मिळविले ९४ टक्के

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा सिबीएससी पॅटर्नच्या दहावीच्या परीक्षेत चि.रणवीर रमेश रोडे याने ९४.४% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

परळी वैजनाथ येथील भेल सेकंडरी स्कुलचा चि.चि. रणवीर रमेश रोडे हा विद्यार्थी आदर्श शिक्षक नामदेवराव रोडे गुरुजी यांचा नातु तर दिवंगत रमेश रोडे यांचा मुलगा यांने सिबीएससी बोर्डाच्या दहावीची परिक्षा दिली. त्याने ९४.४ टक्के गुण संपादन करून घवघवीत यश प्राप्त केले आहे.रणविरने मिळवलेल्या या घवघवीत यशबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद,मित्र परिवार आदींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**नियोजन:**जय हनुमान तालीमचा वर्धापन

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा :अर्जुन पुरस्कार विजेते डीवायएसपी पैलवान राहुल आवारे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली जय हनुमान तालीम, चुंबळी फाटा येथे त्यांच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक १७ मे २०२५ शनिवार रोजी दुपारी ३:३० वाजता पार पडणार आहे.या स्पर्धे तील विशेष आकर्षण म्हणजे प्रथम कुस्ती एक लाख ५१ हजार रुपयांची असून ती पैलवान रविराज चव्हाण आणि पैलवान कालीचरण सोलनकर यांच्यामध्ये रंगणार आहे.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रा. राम शिंदे (सभापती, विधानसभा), आ. सुरेश आण्णा धस (आ. आष्टी-पाटोदा-शिरूर), आमदार नारायण आबा पाटील (करमाळा), पंढरीनाथ अण्णा पठारे (कुस्ती महर्षी, पुणे), माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, अर्जुन वीर पुरस्कार विजेते काकासाहेब पवार, युवराज भाऊ काशीद (मराठा गौरव, इंदोर), तसेच धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांचा समावेश आहे. साधू-संतांच्या हस्ते कुस्तीचे उद्घाटन होणार असून, कुस्ती स्पर्धा शिवछत्रपती पुरस्कार विजेते पैलवान बाळासाहेब आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.निमंत्रक गोकुळ आवारे मल्ल सम्राट महाराष्ट्र केसरी यांनी सांगितले की, या कुस्ती मैदानात फिरती किंवा अचानक ठरवलेली कुस्ती होणार नाही, सर्व कुस्त्या पूर्वनियोजित असून शिस्तबद्ध रितीने होणार आहेत. या भव्य कुस्ती महोत्सवाचा सर्व कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय हनुमान तालीम,चुंबळी फाटा,पाटोदा यांनी केले आहे पान २ वर

# पद्मश्री शंकरबापू विद्यालयाचे यश

**अभिनंदनिय:**निकाल लागला शंभर टक्के







पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील हसेगाव ( के) येथील पद्मश्री शंकरबापू माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून शाळेतील आदित्य लक्ष्मण कुरुंद हा ८०.००% घेऊन प्रथम आला आहे तर द्वितीय प्रिती अंकुश कोल्हे ही ७६.६० % तर अर्पिता लक्ष्मण कोळी ही ७६.२०% तृतीय आली आहे. विशेष प्राविणयासह चार विद्यार्थी व प्रथम श्रेणीत सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, कोल्हे दत्तात्रय, दराडे बाबासाहेब, हजारे अजित यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे पान २ वर

**मागणी** | **भ्रष्टाचाराची तातडीने सखोल चौकशी करा**

# कटकारस्थानाने आळंदी घाटांची तोडफोड

पुण्यभूमी प्रतिनिधी





पुणे:तीर्थक्षेत्र विकासाच्या नावाखाली आळंदी येथील इंद्रायणी नदीच्या उत्तर तीरावर सुरू असलेले अत्यंत सुंदर व देखण्या घाटांचे शासनातर्फे रात्री-अपरात्री केले जाणारे विद्रूपीकरण ताबडतोब थांबवून, या मागील तथाकथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी केली जावी, अशी मागणी महाराष्ट्रातील समस्त वारकरी संप्रदायातर्फे महाराष्ट्राचे जाणकार व माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील नामवंत संत, कीर्तनकार, प्रवचनकार इ. मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर करणार आहेत. अशी माहिती विश्व शांती केंद्र (आळंदी) व कार्याध्यक्ष, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. ५ जुलै १९८८ रोजी ह्या घाटांच्या बांधणीची सुरुवात झाली. त्यापूर्वी, इंद्रायणीचे तीर अत्यंत गलिच्छ आणि ओंगळवाण्या अवस्थेत होते. त्याचे सुशोभीकरण आणि वारकर्यांना सुरक्षित व स्वच्छ घाटांच्या माध्यमातून इंद्रायणी नदीत स्नान व इतर उपचार करून देण्याचे स्वप्न, अनेक संत सज्जनांनी पाहिले. त्यात वारकरी परंपरेचे अध्वर्यू ह.भ.प. वै. धुंडा महाराज देगलूरकर, ह.भ.प. वै. शंकरबापू शिंदे-आपेगांवकर, ह.भ.प. वै. बाळासाहेब भारदे, ह.भ.प. वै. किसन महाराज साखरे, पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. पी.जी. भिडे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. माधवराव सूर्यवंशी, आळंदीचे तत्कालीन नगराध्यक्ष श्री. सुरेश गांधी आणि त्यांचे सहकारी व महाराष्ट्रातील इतर हजारो वैष्णव वारकरी इ.चा समावेश होता.

वाट खडतर होती, अनेक अडथळे येऊन सुध्दा महाराष्ट्रातील लाखो वारकर्यांच्या प्रत्यक्ष सहभागाने, सुमारे १८ - २० वर्षांच्या कालावधीत हे कार्य पूर्ण झाले आणि नदीच्या दुतर्फा अत्यंत देखण्या आणि टिकाऊ अशा घाटांची निर्मिती झाली. घाट बांधून झाल्यावर, इंद्रायणी नदीच्या दक्षिण तीरावर विश्वरूप दर्शन मंच देखील उभारण्यात आला. योगायोगाने, या कार्यासाठी भारताचे तत्कालीन शिक्षणमंत्री व संत वृत्तीचे शास्त्रज्ञ असलेले डॉ. मुरली मनोहर जोशी तसेच तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. हे संपूर्ण कार्य श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती आणि विश्वशांती केंद्र (आळंदी) यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्णत्त्वास नेण्यात आले. परंतु, सुमारे महिन्याभरापूर्वी रात्रीच्या वेळी अचानक आळंदी इंद्रायणी नदीच्या उत्तर तीरावरील घाट फोडण्याच्या कामास सुरूवात झाली. चौकशी करता असे सांगण्यात आले की, तीर्थक्षेत्र विकासाच्या आराखड्याखाली सांडपाण्याचे पाईप टाकण्याचे काम जिल्हाधिकार्यांच्या आदेशानुसार केले जात पान २ वर

# भूमी अभिलेख कार्यालयात मनमानी !

**बोंबला:**अधिकारी,कर्मचारी राहतात गैरहजर




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:येथील उपविभागीय भूमी अभिलेख कार्यालयामध्ये शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली जात आहे. कार्यालयातील कर्मचारी अधिकारी सातत्याने गैरहजर असतात. दोन ठिकाणचा चार्ज असल्याचे कारण दाखवत कार्यालयात उपअधिक्षक उपस्थित रहात नसल्यामुळे अनेक कामं रखडले आहेत, अशी तक्रार शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी वरिष्ठाकडे केली आहे. पेरणीचे दिवस असल्याने नंबर बांध, नकाशे, मोजणी, हाद्द कायम करणे, गुंटेवारी. इत्यादी शेतकऱ्यांचे कामे गेली सहा सहा महिन्यापासून रखडले आहेत. एका पान २ वर